महाराष्ट्र भूदान प्रकाशन ६ वें

९८५४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ९७८



“ आमचा विचार समजल्याशिवाय कोणी जमीन देईल तर आम्हांला दुःख होईल. कसेंहि करून जमीन जमविणें हा कांहीं आमचा उद्देश नाहीं. सर्वोदयाची वृत्ति आम्हांला निर्माण करावयाची आहे. ”

REFBK-0008187

# चें गोकूळ

अप्पा पटवर्धन

अनुक्रम
विभाग
क्रमांक

किंमत नं० ४ आणे

७९८७
K-0008187

# ‘ गोकुळा ’ची

‘ गांवाच्या गोकुळा ’ चें हें चित्र श्री. अप्पासाहेब पटवर्धन यांच्या लेखणींतून, नव्हे हृदयांतून बाहेर पडलें आहे. या पुस्तिकेच्याद्वारा अप्पा तुमच्या आमच्याशीं कळवळ्यानें बोलत आहेत. त्यांचा प्रत्येक बोल उत्कटतेनें आणि आमच्याविषयींच्या कळकळीनें भरलेला वाटतो.

जमीनदारांनीं आपल्यापाशीं गरजेहून जादा असलेली जमीन ती नसलेल्या शेतमजुरांत वाटून द्यावी हा विचार ‘ भूदान–यज्ञ ’ या नांवाचें आंदोलन अवतरण्याच्या चार कीं पांच वर्षें पूर्वीच श्री. अप्पांच्या अंत:करणांत प्रथम स्फुरला आणि त्या वेळीं अंबरनाथ येथें झालेल्या महाराष्ट्र कार्यकर्त्यांच्या संमेलनांत त्यांनीं तो कार्यकर्त्यांपुढें मांडला. श्री. बाळासाहेब खेर यांनीं रत्नागिरी येथील आपलें घर व जमीन सार्वजनिक कार्याप्रीत्यर्थ अर्पण केली, त्यांतून श्री. अप्पासाहेबांना या दानकल्पनेची प्रेरणा मिळाली होती. अर्थात् या कल्पनेला आंदोलनाचें स्वरूप आणण्याला श्री. विनोबांची प्रचंड शक्ति आणि तपस्याच कारणीभूत झाली, हें नि:संशय. पण त्यामुळें साहजिकच भूदान–यज्ञ–आंदोलन हें जणूं आपलेंच लेंकरूं इतक्या आत्मीयतेनें श्री. अप्पासाहेबांनीं तें स्वीकारलें आहे आणि त्याचें स्वरूप लोकांपुढें मांडलें आहे.

हें सर्व लिखाण श्री. अप्पांनी आपल्या रत्नागिरी जिल्ह्यांतील बांधवांना उद्देशून केलें आहे. अप्पांना रत्नागिरी जिल्ह्याविषयीं वाटणारें प्रेम स्वदेशाविषयींच्या प्रेमाइतकेंच प्रगाढ आहे. या पुस्तकाच्या

अगदीं शेवटीं 'आपला नवभारत' या नांवाच्या प्रकरणांतील शब्दाशब्दांतून हें त्यांचें प्रेम ठिपकत आहे. आपल्या जिल्ह्यांत सर्वोदयाच्या सर्व कल्पना साकार व्हाव्यात अशी त्यांना तळमळ आहे. त्यासाठींच त्यांची 'गोपुरी' आहे. त्यासाठींच आपल्या सद्गुरूचा—गांधीजींचासुद्धां सहवास सोडून ते रत्नागिरी जिल्ह्यांत येऊन काम करूं लागले. रत्नागिरी जिल्ह्यांतील भावभोळ्या पण हुशार, चलाख, कर्तबगार लोकांनीं जर भूदानाचा संदेश आचरला तर महाराष्ट्राला तो जरूर आदर्श घालून देईल, अशी त्यांना मोठी आशा वाटते.

त्यांनीं रत्नागिरी जिल्ह्याला उद्देशून लिहिलें तें सर्वस्पर्शी असल्यामुळें महाराष्ट्रांतील इतर जिल्ह्यांतील, इतकेंच काय, भारतांतील सर्व लोकांना उद्देशून असल्यासारखेंच आहे. त्यांनीं विवरण करतांना दिलेलीं कांहीं उदाहरणें स्थानिक असलीं तरी विचार सार्वत्रिक आहे. म्हणून हें पुस्तक साऱ्या महाराष्ट्रापुढें ठेवण्याजोगें आम्हांला वाटतें.

वाचक त्याचा चिंतनपूर्वक विचार करतील अशी मी उमेद बाळगतों.

—भाऊ धर्माधिकारी

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
१८८१८
अनुक्रम ४२/नि
विभाग ८०८
क्रमांक १८४४५५
नों. दि.
शाखा.

# अर्पण

मी ही पुस्तिका बायाच्या–माझ्या दिवंगत मातेच्या–पवित्र स्मृतीला अत्यंत भक्तिभावानें अर्पण करतों. या पुस्तिकेंतील विचार मला गांधी-विनोबांकडून मिळाले त्याहूनहि तिच्याकडूनच अधिक मिळालेले आहेत. आज ती हयात असती तर भूदान यज्ञाच्या आंदोलनानें तिला समाधान वाटलें असतें आणि त्यांत भाग घेतल्याबद्दल तिनें माझी पाठ थोपटली असती.

गोपुरी
ता. १३।१०।१९५४ }

अप्पा पटवर्धन

# हेतु

मी हें लिखाण मुख्यतः रत्नागिरी जिल्ह्यांतील रहिवाशांना उद्देशून करीत आहें. माझी फार इच्छा आहे कीं, भूदान–यज्ञाचा पवित्र संदेश जिल्ह्याच्या कोनाकोपऱ्यापर्यंत पोंचावा, लोकांनीं तो झेलावा आणि रत्नागिरी जिल्ह्यांत एकहि भूमिहीन शेतकरी राहूं नये. आणि यासाठीं कायद्याच्या सक्तीचीहि जरूरी पडूं नये. सौम्य प्रकृतीच्या रत्नागिरी जिल्ह्यानें हें वांटप न्यायाखातर व प्रेमाखातर स्वयंप्रेरणेनेंच करावें.

गेल्या वर्षी मी भूदान–यज्ञाच्या प्रचारार्थ सबंध जिल्ह्याची पायीं प्रदक्षिणा केली. पायीं जाण्यांत एक मुख्य हेतु हा होता कीं, आडवळणाच्या लहानसहान गांवींहि जातां यावें, तसेंच वाटोवाट जे कोणी भेटतील, किंवा ज्यांचीं घरें लागतील, अशांशीं स्वस्थपणें बोलतां यावें. भूदान–यज्ञाचा संदेश जमीनमालकांसाठीं तर आहेच, पण तो कुळांसाठीं, मजुरांसाठीं आणि लहानथोर सर्वांसाठींच आहे. ती एक नवीन जीवनदृष्टिच आहे. ही दृष्टि थोरांच्या कृपेनें मला लाभली, माझ्या सहकाऱ्यांना लाभली, तशीच ती माझ्या रत्नागिरी जिल्ह्यांतील यच्चयावत् बंधु–भगिनींनाहि मिळावी अशी मला उत्कंठा आहे. रत्नागिरी जिल्ह्याची भूमि–आणि साऱ्या भारताचीहि–मला परमप्रिय व परमपवित्र वाटते. तिचें वारंवार व निरनिराळ्या दऱ्याखोऱ्यांतून व जाळी–झुडपांतून दर्शन घेण्यांत मला सुख वाटतें. म्हणून संधी मिळेल तर मी आणखीहि पुन्हां पुन्हां प्रदक्षिणा करीन आणि भूदान यज्ञाचा संदेश आबाल–वृद्धांना ऐकवीन. पण मला तितकी सवड नाहीं आणि ऐकणारांनाहि मी म्हणेन तेव्हां व तेथेंच गोळा होतां येईल असें नाहीं.

सभांतून मी दीड दीड, दोन दोन तासहि बोलत असें, तरीसुद्धां भूदान॰ यज्ञाचा सारा विषय व मनांतील सारे विचार बोलून होत नसत. कांही विचार सोडून द्यावेच लागत.

परंतु छापखान्याच्या साधनामुळें वक्ता व श्रोता आपापल्या सोयीच्या वेळीं बोलूं व ऐकूं शकतात, दूर अंतरावरूनहि ऐकूं शकतात. म्हणून मी हा छापखान्याचा आश्रय घेत आहें. हें चोपडें म्हणजे रत्नागिरी जिल्ह्या-तील कुणबी–महारांपासून मराठे, ब्राह्मण, मुसलमानादि समस्त बंधु–भगिनींना मी अत्यंत जिव्हाळयानें लिहिलेलें पत्रच आहे. वाचणारांनीं तें निरक्षर श्रोत्यांना वाचून दाखविलें व समजावून दिलें तर मीं त्यांचा आभारी होईन.

माझे तरुण मित्र व सहकारी श्री. गोबिंदराव शिंदे यांचाहि हें चोपडें लिहिण्याबद्दल आग्रह पडला, तसेंच छापण्याची व प्रसाराची व्यवस्था महा-राष्ट्र सेवा संघानें अंगावर घेतली, म्हणूनच मी हें लिखाण करण्याचें धैर्य करीत आहें.

भूदान यज्ञाबद्दल आस्था वाटणारे व व्यक्तिशः माझ्याबद्दलहि सद्भाव बाळगणारे अनेक सज्जन जिल्ह्यांत सर्वत्र आहेत. अशा सर्वांना माझी विनंति आहे कीं, त्यांनीं या पुस्तिकेचा सर्वत्र व त्वरित प्रचार करण्यास झटून मदत करावी.

गोपुरी
ता. १७।१०।१९५४

अप्पा पटवर्धन

# गांवाचें गोकूळ

## भूदान–यज्ञाचा उद्भव व वाढ

**पूज्य विनोबांची थोरवीः—** विनोबा हे आजच्या काळांतील प्रति-ज्ञानेश्वरच आहेत. ज्ञानेश्वरांचे उभयतां बंधू–निवृत्ति व सोपान–जसे त्यांच्या-प्रमाणेंच बुद्धिमान् आणि वैराग्यशील होते त्याचप्रमाणें विनोबांचेहि दोघे भाऊ श्री. बाळकोबा व श्री. शिवाजी हेहि बुद्धिमान्, विद्वान् व कडकडीत ब्रह्मचारी व समाजसेवेलाच वाहिलेले आहेत. तिघेहि भाऊ परमार्थनिष्ठ निघाल्याचें तिसरें उदाहरण साऱ्या जगाच्या इतिहासांतहि नसेल.

बालपणापासूनच विनोबांनीं देशसेवेचा व ब्रह्मचर्याचा दृढ संकल्प केला. संतवाङ्मयाची त्यांना फारच आवड व तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वरादिकांचे ग्रंथ त्यांनीं बालपणींच मुखोद्गत केले. १९१४ सालीं टिळकांचा ‘गीतारहस्य’ हा ग्रंथ प्रसिद्ध झाला; त्याचीं विनोबांनीं लागोपाठ चौदा पारायणें केलीं आणि मुंबईस इंटरमीजिएटच्या परीक्षेसाठीं जाण्याऐवजीं वेदांताच्या अध्ययनासाठीं काशीची वाट धरली. तेथून १९१६ सालीं ते गांधीजींच्या सत्याग्रहाश्रमांत येऊन दाखल झाले आणि मध्यंतरीं तंतोतंत एक वर्षभर वाईच्या श्री. नारायणशास्त्री मराठे यांजकडे उपनिषदांच्या अभ्यासासाठीं गेले होते, त्या व्यतिरिक्त प्रथम साबरमतीच्या, व १९२१ सालापासून वर्ध्याच्या स्वतःच स्थापन केलेल्या, आश्रमांत अखंड साधना करीत राहिले. १९४० सालीं वैयक्तिक सत्याग्रहाची मोहीम सुरू करतांना गांधीजींनीं पहिले सत्याग्रही म्हणून त्यांचीच निवड केली, तेव्हांच प्रथम बाहेरच्या जगाला विनोबांचें नांव ऐकायला मिळालें! पुढील ४ वर्षे त्यांनीं तुरुंगांत काढली. त्या मुदतींत त्यांनीं भारताच्या साऱ्या भाषांचें व लिपींचें आपलें ज्ञान पूर्ण करून घेतलें. कुराणाचा अभ्यास करण्यासाठीं अरबी भाषाहि शिकून घेतली. फारसी, फ्रेंच व इंग्रजी या भाषा त्यांना अवगत आहेत व संस्कृतांतील सारे धर्म–वाङ्मय तर त्यांनीं आत्मसात् केलेलें आहे.

८९८६

भगवद्गीतेवर त्यांची अपार भक्ति व व्यासंग आहे. आणि त्यांनीं गीतेचें केलेलें समश्लोकी मराठी भाषांतर–गीताई–अप्रतिम वठलें असून त्यांचीं मधुकर, गीताप्रवचनें, स्थितप्रज्ञ–लक्षणें इत्यादि अनेक पुस्तकें लाखों निष्ठावान् वाचकांच्या जीवनांत परिवर्तन करीत आहेत.

आम्ही गांधीजींच्या काळांत जन्मलों आणि त्यांच्या नेतृत्वाखालीं काम करायला मिळाल्यानें आमच्या जन्माचें सार्थक झालें. तसेंच त्यांच्यामागें विनोबांसारख्या लोकोत्तर सत्पुरुषाच्या नेतृत्वाखालीं भूदान–यज्ञासारख्या परमपवित्र चळवळींत भाग घेण्याची आम्हांला संधि मिळाली हें आमचें परमसौभाग्य आहे !

**भूदान–यज्ञः—** १९५१ च्या एप्रिल महिन्यांत दक्षिण हैद्राबादलगत शिवरामपल्ली येथें सर्वोदय समाजाचें संमेलन झालें, त्याला विनोबा वर्ध्याहून पायीं गेले व संमेलन आटपल्यानंतर त्यांनीं तेलंगणांत धुमसत असलेल्या जमीनदार–शेतकरी विग्रहांतून कांहीं मार्ग काढण्याच्या हेतूनें त्या भागांत पायीं प्रवास सुरू केला. त्या दौऱ्यामध्यें १८।४।१९५१ रोजीं पोचमपल्ली या गांवीं विनोबांच्या प्रार्थना–सभेमध्यें तेथील महारांनीं आपल्या निराधार स्थितीचें वर्णन करून आपल्याला सरकारकडून पोटापुरती जमीन मिळवून द्याल तर आपण सारे श्रम करून, कोणाला कसला उपद्रव न देतां, सुखासमाधानानें राहूं असें सांगितलें. त्यांची ती मागणी विनोबांना रास्त वाटली व त्यांनीं तेथें जमलेल्या जमीन मालकांना विनंति केली कीं, आपल्याच कंगाल हरिजनबंधूंच्या प्रीत्यर्थ त्यांनीं थोडथोडी जमीन दान द्यावी.

सोळा महार कुटुंबांना प्रत्येकीं ५।५ एकर याप्रमाणें ८० एकर जमिनीची आवश्यकता होती. श्रोत्यांमधून श्री. रामचंद्र रेड्डी नांवाचे एक तरुण सज्जन मालक उभे राहिले व त्यांनीं आपण त्या भूमिहीन हरिजनांना स्वतःची चांगल्यापैकीं १०० एकर जमीन दान देतों असें जाहीर केलें !

विनोबांना आपल्याला परमेश्वरच पावला असें वाटलें. कारण सज्जनांचीं हृदयें हेंच परमेश्वराचें निवासस्थान आहे. प्रत्येक मनुष्य हा मुळांत सज्जनच आहे, त्याच्या हृदयांत परमेश्वरच वसत असतो. तो निद्रिस्त असला तरी सच्च्या भक्ताच्या हांकेसरशीं तो जागा व प्रगट होतो याचें प्रत्यंतर आलें !

त्या दिवसापासून विनोबा ज्या ज्या गांवीं जात तेथें तेथें जमीन-मालकांकडून भूमिहीनांसाठीं भूदानाची मागणी करीत आणि प्रत्येक ठिकाणीं सज्जन मालक त्यांना भूमीचीं दानें देतहि. तेलंगणांत अशा तऱ्हेनें १२००० एकर जमीन मिळाली.

तेलंगणांतील दौरा आटपून विनोबा वर्ध्याला पायींच परत आले तों त्यांना जवाहरलालजींकडून भेटीचें निमंत्रण आलें. विनोबांना रोकड पैशाचा व्यवहार शक्य तों टाळायचा असतो. कारण पैशापायींच समाजांत नाना अनर्थ घडत आहेत. खरोखरीं पैसा म्हणजे संपत्ति नव्हे तर ती केवळ संपत्तिदर्शक मुद्रा आहे, चिठी आहे. परंतु व्यवहारांत फोटोनें माणसाला व चिठीनें लेखकाला पदच्युत करून त्याची जागा बळकावली आहे, म्हणून व्यवहारांतून या तोतया पैशाची हकालपट्टी करण्यावर विनोबांचा नित्य कटाक्ष असतो. मोटर-रेल्वे-विमानाचा प्रवास पैशाविना साधण्यासारखा नाही. शिवाय पायीं चालणारा स्वतंत्र असतो, स्वतःचा धनी असतो. पायीं प्रवासांत आणखीहि कितीतरी गोष्टी साधतात. म्हणून विनोबा होतांहोईतों पायीं किंवा फार तर गाडी-घोड्याच्या गाडींतून प्रवास करतात. दिल्लीलाहि ते पायींच चालत गेले. वाटोवाट भूदान-यज्ञाचा प्रचार चालूच असे. तपश्चर्या, विद्वत्ता, चिंतन, प्रतिभा व चारित्र्य यांच्यापायीं विनोबांच्या वाणीमध्यें अशी कांहीं शक्ति आलेली आहे कीं, ज्यांच्या ज्यांच्या कानीं त्यांची ती अमृततुल्य वाणी पडते ते ते त्यांच्या भजनीं लागतात. अर्थात विनोबांना दिल्लीच्या वाटेवरहि भरपूर भूदानें मिळालीं. तेथून ते उत्तर प्रदेशाच्या कार्यकर्त्यांच्या आग्रहावरून तिकडे गेले. तिकडे तर त्यांना ४–५ लाख एकर जमिनीचीं दानें मिळालीं व भूदान-यज्ञ आंदोलनाचा सर्वत्र बोलबाला सुरू झाला. एप्रिल १९५२ मध्यें बनारस-नजीक सेवापुरी येथें सर्वोदय समाजाचें संमेलन व सर्व सेवा संघाची सभा झाली, त्या प्रसंगीं साऱ्या भारतांतून पुढील दोन वर्षांत २५ लाख भूमिदानें प्राप्त करण्याचा सर्व सेवा संघानें संकल्प केला. सर्व सेवा संघाचे सरचिटणीस श्री. शंकरराव देव यांनीं प्रांतोप्रांतीं पदयात्रा काढून आंदोलनाला सर्वस्वीं वाहून घेतलें. विनोबांनीं खुलासा केला कीं हे २५ लाख एकर म्हणजे

केवळ पहिला हप्ता आहे, १९५७ सालापर्यंत एकूण ५ कोटि एकर जमीन दानार्थ मिळवून तिची भूमिहीनांमध्यें वांटणी करावयाची आहे. विनोबाजी त्या निर्धारानें काम करीत आहेत.

**गांवाचें गोकुळः**—उत्तर प्रदेशाची यात्रा आटोपून विनोबांनीं बिहारच्या पुण्यभूमींत प्रवेश केला. बिहार म्हणजे बुद्धभगवानांची भूमि. तेथें त्यांनीं आपला निश्चय जाहीर केला कीं, बिहारच्या भूमीचा प्रश्न संपूर्णपणें सुटल्या-खेरीज, अर्थात् तेथें ३२ लाख एकर जमीन मिळाल्याखेरीज, आपण बिहार सोडून परत जाणार नाहीं. त्यांचा तो महान् संकल्पहि बऱ्याच अंशानें सफल झाला आहे. दोन वर्षांत २५ लाखांच्या वर जमीन मिळाली. बिहारमध्येंहि ५ ऑक्टोबर १९५४ पर्यंत २२ लाख १७ हजार एकर जमीन मिळाली आहे. बाकीची सहजीं मिळाल्याखेरीज राहणार नाहीं, म्हणून आतां मिळालेल्या जमिनीच्या वांटणीकडे विशेष लक्ष पुरविलें जात आहे. उत्तर प्रदेश, बिहार व उडीसा यांमध्यें विनोबांना कित्येक सबंध गांवच्या गांव दान मिळाले आहेत. जेथें जमीन घाऊक प्रमाणांत वांटली जाते तेथें भूमिदाते व पूर्वींचे भूमिहीन यांच्यामध्यें सद्भावना व नवी उमेद यांचें भरतें येतें व गांवामध्यें नवजीवन संचरतें, गांवाचें गोकुळ बनतें. विनोबांची इच्छा आहे कीं, भारतांतील प्रत्येक गांवाचें अशा प्रकारें गोकुळ बनावें. तुमची आमचीहि तशीच इच्छा असणार. रत्नागिरी जिल्ह्यांतील प्रत्येक गांव कोर्टकचेऱ्यांच्या निवाड्यांनीं नव्हे तर ग्रामस्थांच्या आपापसांतील प्रेमानें, एकोप्यानें, समाधानानें नांदावा, माझ्या स्वतःच्या गांवाचें असलें गोकुळ बनावें असें कोणाला वाटत नाहीं ?

गांवांचीं गोकुळें बनविण्याचें सामर्थ्य भूदान-यज्ञामध्यें आहे.

## सबै भूमि गोपालकी

सर्व प्रकारच्या संपत्तीच्या लोभामध्यें जमिनीचा लोभ सर्वांत जबरदस्त आहे. पाव गुंठा जमिनीसाठीं लोक हायकोर्टापर्यंत लढतात. "आणि तुम्ही तर म्हणतां कीं जमीनमालकांनीं आपल्या घराण्यांत पुरातन काळापासून

चालत आलेली वडिलोपार्जित जमीन मुकाट्यानें, प्रेमानें, भूमिहीनांना देऊन टाकावी ! हें व्हावें कसें ?"

कसें व्हावें काय विचारतां ? तें प्रत्यक्ष होतच आहे. बाप आपली लाडकी, प्राणापरीस पाळलेली व वाढविलेली मुलगी जशी मोठ्या प्रेमानें, भक्तिभावानें, सोहळ्यानिशीं वराला अर्पण करून आणि वर अलंकारादि देऊन कृतार्थ बनतो, अगदीं तसेंच जमीनदार–आणि गरीब छोटे मालकहि– भूमिहीनांना, आपल्या आजवरच्या कुळां–मजुरांना जमिनी अर्पण करण्यांत, आणि वर बैल, नांगर–जोखडहि देण्यांत धन्यता मानीत आहेत.

सर्वांनींच असें करावें आणि धन्य व्हावें ! जे प्रेमानें देणार नाहींत त्यांना उद्यां कायदा द्यायला लावील. कायद्याच्या मार्गांत अडथळे येतील तर न जाणो, बंडाळीहि माजेल. तींत सर्वांचेंच नुकसान होईल. पण भूमीचें फेरवांटप टळणार मात्र नाहीं.

बंडाळी माजेल म्हणणें म्हणजे धमकी नव्हे, ती कळकळीची पूर्व- सूचनाच आहे.

परंतु भूदान–यज्ञाचा पवित्र संदेश लोक समजून घेतील तर तो त्यांना पटल्याखेरीज राहणार नाहीं आणि बहुतांनीं त्याचें आचरण केलें तर त्या- पासून समस्तांचें कल्याणच कल्याण आहे.

आणि मला हा भरंवसा आहे, त्यांतल्या त्यांत आपल्या रत्नागिरी जिल्ह्याच्या बाबतींत तर मला विशेषच भरंवसा वाटतो कीं, लोक मानतील, गुण्यागोविंदानेंच भूमिवांटप होईल. कायदाहि यथाकाळ होईल–होतच आहे, आणि त्याचा कोणी विरोधहि करण्यास धजणार नाहीं.

पण त्यासाठीं भूदान–यज्ञामागील सद्विचार लोकांना नीट समजावून दिला पाहिजे, त्यांच्या शंकांचें, अडीअडचणींचें, त्यांना वाटणाऱ्या धास्तीचें निवारण केलें पाहिजे. या लिखाणाचा तोच हेतु आहे. विनोबांचा तर सारा भर विचारप्रचारावरच आहे. भिडेस्तव, भयास्तव, दडपणास्तव कोणी तसूभरहि जमीन देऊं नये. समजलें, मानवलें, पटलें कीं मग लोक आपण होऊन–नको म्हटलें तरीहि–देतील आणि इतरांकडून देववितील. जी अनिवार्य प्रेरणा आम्हांला प्रचाराला प्रवृत्त करते ती त्यांनाहि द्यायला लावल्याखेरीज कशी राहील ? असो.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
ता. दि.

**बद्लता न्यायः**—सामाजिक न्याय काळानुसार बदलत असतो. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे"––राष्ट्रांराष्ट्रांमधील न्यायाचें हें नवीन तत्त्व लोकमान्यांनीं मांडलें आणि त्याचीच परिपूर्ति म्हणून महात्माजींनीं त्यानंतर "भारत छोडो"ची निकडीची घोषणा केली. अवघ्या पांच वर्षांनींच इंग्रज भारत सोडून निघून गेले. त्यांच्या मागोमाग ६०० संस्थानिकांनीं झरझर आपापल्या राजगाद्याहि सोडल्या. साम्राज्यें गेलीं, राज्यें गेलीं, जहागिरी गेल्या, खोती गेली, इनामें चाललीं आणि यांत अन्याय नव्हे तर अन्यायाचें निरसनच झालें. इंग्लंडच्या राजाला पोर्तुगालच्या राजाकडून मुंबई बेट लग्नांत हुंड्यादाखल मिळालें होतें आणि पुण्याच्या दुसऱ्या बाजीरावानें एल्फिन्स्टनसाहेबाला महाराष्ट्राचें राज्य सुपूर्द केलें होतें. पण त्याच पुण्यांत स्वराज्याचा आणि त्याच मुंबईंत 'भारत छोडो'चा पुकार उठला ना ? फ्रेंचांनासुद्धां आम्ही भारतांतील मालकी हक्क सोडावयास सांगितलें आणि त्यांनीं मानलेंहि. पोर्तुगीज लोक मानीत नाहींत म्हणून आम्ही त्यांना आडमुठे म्हणतों आणि काळ त्यांना मानायला लावीलच म्हणतों कीं नाहीं ?

मग तोच न्याय 'सर्व नंबरांच्या राज्यांना' हि लागू झाल्याशिवाय कसा राहील ? जमीनमालक (लँड–लॉर्ड=भू–पति) म्हणजे राजेच ! कुळें म्हणजे त्यांची रयत. सगळीकडचीं राज्यें खलास झालीं, मग हीं भुरटीं राज्यें तरी कशीं टिकणार ? ब्रह्मदेश ब्रह्मी लोकांचा. थिबा राजा इंग्रजाला शरण गेला किंवा कैद झाला एवढ्यावरूनच इंग्रजाला ब्रह्मदेशावर राज्य करण्याचा हक्क पोंचत नाहीं. महाराष्ट्र एल्फिन्स्टनला देऊन टाकण्याचा बाजीरावाला अधिकारच नव्हता. स्वराज्य हा त्या त्या देशच्या लोकांचा अविभाज्य हक्क आहे. त्याचें कोणी दान देऊं शकत नाहीं, कोणी छिनवून घेऊं शकत नाहीं. घेतला तरी तो चोरीचा माल ठरतो. त्याच न्यायानें मी वसतों-कसतों ती जमीन माझी, तिची खंडणी मागण्याचा तिऱ्हाइताला हक्क काय ? तर म्हणे माझ्या आजोबांनीं त्याच्या आजोबाला कर्जफेडीदाखल जमिनीच्या विक्रीचा दस्तऐवज करून दिला होता. पण जमीन ही देवाची देणगी, माणसानें तिची मशागत करून पीक खावें ही ईश्वराची, किंवा निसर्गाची म्हणा,

योजना. माझ्या आजोबाला ती विकण्याचा हक्क नव्हता, त्याच्या आजोबाला विकत घेण्याचा नव्हता. पूर्वी कधीं असला तरी आतां तो रद्द व्हायला पाहिजे.

स्वराज्य हा जसा राष्ट्राराष्ट्रांचा अविभाज्य हक्क तसाच श्रम करून पोटगी कमाविण्याचा प्रत्येक नागरिकाला मूलभूत, नैसर्गिक हक्क आहे. त्याचें मुख्य साधन जमीन हें आहे. देवानें अगोदर जमीन निर्माण केली व मागाहून माणसाला निर्माण केला. जमिनीचा जन्मसिद्ध हक्क कोणी कोणाला विकूं शकत नाहीं. कोणी दुसऱ्याचा हक्क संपादन करूं शकत नाहीं.

**फेरवांटणीः—** म्हणून जमिनीची फेरवांटणी होऊन प्रत्येक इसमाला त्याच्या हिश्शाची जमीन मिळेल तेव्हांच लोकशाहीची परिपूर्ति होईल. आपण स्वराज्य मागितलें आणि आपल्याला तें मिळालें, तें लोकशाहीच्या तत्त्वावर. ज्या तत्त्वानुसार साम्राज्यें मोडून राज्यें स्वतंत्र झालीं त्याच तत्त्वानें आतां जमीनदारी मोडून कुळें किंवा कसवटदार स्वतंत्र व्हायला पाहिजेत. खंड (णी) पद्धति बंद व्हायला पाहिजे. लोकशाहीमध्यें सारेच राजे, अर्थात् सगळेच जमीनमालक.

आमचा हा मुद्दा लक्षांत येण्यासाठीं जमिनीची मालकी मुळांत कशी उद्भवली, कशी वाढली, खंडवसुलीची पद्धति मुळांत कशी उद्भवली त्याचा इतिहास लक्षांत घ्यावयास पाहिजे.

**मालकीचें मूळः—** जमीनमालकी मुळांत दोन प्रकारांनीं उद्भवली : मशागत व बळकावणी. जो ज्या जमिनींत वसला, ज्या जमिनींत ज्यानें घाम गाळून कांटेकुटे, जाळीं झुडुपें साफ केलीं, खांचखळगे भरून काढले, जमीन सपाट केली, बांध-बंदिस्ती केली, झाडमाड लावले, विहीर खणली, गडगा घातला ती जमीन त्याची म्हणून ओळखली जावी हें साहजिक होतें, वाजवीहि होतें. मुळांत कोणी जमिनी ब्रह्मदेवाकडून खरेदी केल्या नव्हत्या. ज्याला त्याला केवळ श्रमाच्या हक्कानेंच मालकी प्राप्त झाली.

मूळच्या कसवटदाराला जशी मशागतीनें मालकी मिळाली तशीच ती मध्यांच्या कसवटदारालाहि कां मिळूं नये ? मूळच्या कसवटदारानें श्रीमंती-पायीं, किंवा अन्य अधिक किफायतशीर धंदे मिळाल्यानें, शेती सोडून दिली असेल तर त्याचा मालकी हक्कहि नष्ट कां होऊं नये ?

शेती म्हणजे जमिनीची चाकरी आणि पीक म्हणजे पगार. जो चाकरी करतो त्यालाच सबंध पगार मिळतो, त्याला पगाराचा कांहीं हिस्सा आधींच्या चाकराला देत राहावें लागत नाहीं.

पण कुळानें, म्हणजे सध्यांच्या चाकरानें मात्र धन्याला म्हणजे अगोदरच्या चाकराला पगाराचा, म्हणजे पिकाचा, कांहीं हिस्सा दिला पाहिजे असा रिवाज पडलेला आहे. प्रांताची जागा मिळावी म्हणून एकानें मामलेदाराची जागा सोडली तर दुसऱ्या मामलेदारानें पहिल्या मामलेदाराला कांहीं खंड द्यायचा नसतो. कांहीं प्राथमिक शिक्षक अधिक कमाईच्या आशेनें मास्तरकी सोडून आचारी होतात, पण त्यांची जागा ज्या बेकाराला लाभते त्यानें त्या आचाऱ्याला मास्तरकीचा खंड द्यायचा नसतो ! बेकारीचा प्रसंग आला तरी शिकलेला माणूस इतका भोळसटपणा करणार नाहीं.

मग मूळचा शेतकरी जेव्हां अधिक कमाईच्या आशेनें शेती सोडून वकिली करूं लागतो तेव्हां त्याची जागा घेणाऱ्या कुळानें मात्र वकीलसाहेबांच्या घरीं अर्धेल कां पोंचवायची ? केवळ तो भोळसट म्हणूनच का ?

**खंडाचें समर्थन व मर्यादाः—** नव्हे, हा केवळ भोळेपणाच नव्हे. मूळ शेतकऱ्यानें मूळच्या पडित नापीक जमिनींत आपलें रक्त अर्थात् कष्ट ओतून ती सुधारून सुपीक बनविली. त्यानें तींत आंबे-फणस लावले, शिंपले, राखले. दीर्घ काळ त्यांची सेवाचाकरी केली तेव्हां कोठें २०-२५ वर्षांनंतर त्याला त्यांचीं थोडथोडीं फळें चाखायला मिळाली. आतां ती जमीन दुसऱ्याच्या स्वाधीन करून तो चालला तर त्या दुसऱ्या इसमानें त्याला आयत्या मिळणाऱ्या आंब्या-फणसांचा वांटा मूळ मालकाला द्यावा हें वाजवीच आहे. यालाच खंड म्हणायचें. जसा आंब्याच्या झाडांचा खंड तसाच भात-जमिनीचाहि.

परंतु जमिनीचा खंड घेणें जसें वाजवी ठरतें तशी खंडवसुलीच्या मुदतीवरहि मर्यादा पडते. दहावीस वर्षांच्या मेहनतीनें जमीन पिकाला आली म्हणून खंड घ्यायचा तर तो पुढील दहावीस वर्षेंपर्यंतच उतरत्या प्रमाणांत घेणें उचित, यावच्चंद्रदिवाकरौ घेणें रास्त होऊं शकत नाहीं.

उदाहरणार्थ, वेलणकरांनीं हॉटेल काढून तें नांवलौकिकाला आणलें.

आतां तीच जागा व तोच धंदा वीरकरांनीं चालवायला घेतला तर लौकिका-बद्दल (याला इंग्रजींत " गुड वुइल " म्हणतात ) वीरकरांनीं वेलणकरांना कांहीं वर्षासन द्यावें हें उचित आहे. तसा प्रघातहि आहे. पण तसें ते कांहीं वर्षेंपर्यंतच देतील. हॉटेलचा पुढील लौकिक वीरकरांच्या स्वतःच्या कर्तबगारीवरच अवलंबून राहील.

जमिनीचा खंड हाहि लौकिकासारखा मर्यादित मुदतीपुरता शोभेल. वेलणकर वीरकरांकडून फार काळ किंवा भारी रकमेची मागणी करूं लागले तर वीरकर म्हणतील, मला तुमच्या लौकिकाची पर्वा नाहीं. तुम्हांला पिढ्यान् पिढ्या खंड देण्याऐवजीं मी माझ्या स्वतःच्या कर्तबगारीनें तुमच्याचसमोर होटेल काढून तेंच नांवारूपाला आणीन.

परंतु होटेल नवीन काढतां येतें तशी जमीन नवीन बनविण्यास वाव राहिलेला नाहीं. साऱ्या जमिनीचे कब्जे होऊन चुकले आहेत. ज्याला जेवढी जमीन बळकावितां आली तेवढी त्यानें बळकावली आहे आणि नवीन येणाराला झोडपून लावायला बळीराजा सोटा उगारून उभा आहे. नवखा तो बिचारा गरीब* त्याचें मिश्किल मालकांपुढें काय चालणार? त्यानें पिढ्यान् पिढ्या खंडकरी कूळ म्हणूनच अर्धपोटीं रावलें पाहिजे !

**बळकावणीः—** जमीनमालकी मुळांत मशागतीनें प्राप्त झाली तशी ती बळकावणीनेंहि हस्तगत केली गेली. जमीनमालकीच्या बाबतींत 'बळी तो कान पिळी' हा न्याय अव्याहत चालत आलेलाच आहे. युरोपियन लोकांनीं आफ्रिका-अमेरिकेच्या निरनिराळ्या प्रदेशांवर आपापल्या राष्ट्रांचीं निशाणें रोवलीं तेव्हांपासून ते प्रदेश आंतील साऱ्या आदिवासींसह त्या त्या राष्ट्रांच्या मालकीचे झाले. आतां आशियांतील लोक तिकडे शेती करायला जाऊं म्हणतील तर त्यांना सत्ताधाऱ्यांच्या तोफखान्याला बळी पडावें लागेल.

ही जशी बड्या-बड्यांची झोटिंगशाही चालू आहे तशीच खातेदारांची

---

* गरीब व मिश्किल हे मूळ आरबी शब्द. गरीब=प्रवासी व मिश्किल = घरंदाज.

सत्तासुद्धां कायद्यानें राखलेली असली तरी ती कमी-जास्ती प्रमाणांत बळकावणीवरच आधारलेली आहे हें कबूल करावें लागेल. आगगाडी प्लॅटफॉर्मला येऊन लागतांच धटिंगण पॅसेंजर जसे चांगल्या जागा अडवून टाकतात तशीच सुपीक व सोयिस्कर जमीन साधलें त्यानें अडविली व मागाहून येणाराला निकृष्ट जमिनीवर संतोष मानावा लागला किंवा कूळ म्हणून मिनतवारीनें राहावें लागलें. जमीनमालक हेच कायदे करणारे ( आपल्या हिंदुस्थानांतसुद्धां स्वराज्य होण्यापूर्वी बड्या खातेदारांनाच तेवढा मताधिकार असे ) अर्थात् ते आपल्या सोयीचेच कायदे बनविणार. बलिष्ठांनीं आपापसांत जमिनी वांटून घेतल्या आणि दुर्बलांना ' कुळें ' बनवून विनाश्रमानें खंडवसुलीवर चैन चालविली.

**खरेदीदारः**—पण यावर कित्येक जमीनदार म्हणतील–" आम्ही जमीन बळकावलेलीहि नाहीं किंवा आम्हांला ती नुसत्या मशागतीवर फुकटांतही मिळालेली नाहीं. आम्ही ती रोख किंमत देऊन विकत घेतलेली आहे. "

पण तुम्हीं कोणाकडून घेतलीत ? झोटिंग मालकांकडून तरी घेतलीत किंवा मशागत–मालकांकडून तरी घेतलीत. अर्थात् खरेदी देणाराला जो जेवढा हक्क होता तेवढाच तुम्हांला प्राप्त झाला. ' चोरीचें ' सोनें रोख किंमतीनें विकत घेतलें तरी चोराचा त्यावर होता तेवढाच हक्क खरेदीदाराचाही असतो, म्हणजे तें उघडकीस येईपर्यंतच त्यावर त्याची मालकी राहते. उघडकीस येतांच सोनें जप्त होतें आणि खरेदीदार आरोपी बनतो. तसलाच हा बळजबरीचा हक्क तुम्ही जबर किंमत देऊन संपादन केला आहे, तरी ईश्वर तुमचें रक्षण करो !

तुम्ही मशागत–मालकाकडून जमीन खरेदी केली असली तरी त्यालासुद्धां फक्त आपला " लौकिक " म्हणजे मशागतीनें केलेली सुधारणा तेवढीच विकण्याचा हक्क होता. साऱ्या मूळ जमिनींचा मूळ मालक ईश्वरच; त्याची तुमच्या खरेदीपत्रावर सही मिळालेली नाहीं. त्याअर्थी कसवटदाराला तुम्ही " पागडी " दिलीत, खोलीची किंमत नव्हे. ( मुंबईच्या चाळींतले भाडेकरी आपली खोली दुसऱ्या भाडेकऱ्याला घेऊं देतांना मधल्यामध्यें

रक्कम घेतात तिला ' पागडी ' म्हणतात. ) उभयपक्षीं जमिनीची न्याय्य वांटणी अडवून धरण्याचा तुम्हांला हक्क पोंचत नाहीं.

**मालकी नव्हे, इनाम**:-हाच मुद्दा दुसऱ्या तऱ्हेनें समजावून द्यायचा तर जमीन हें देवानें मानवजातीला दिलेलें इनाम आहे. अर्थात् आजचे खातेदार हे केवळ इनामदार आहेत. इनाम हक्क विकतां खरिदतां येत नाहीं, तो ज्याचा त्यानेंच भोगावयाचा असतो. आज जे भूमिहीन शेतमजूर किंवा कुळें म्हणून ओळखले जातात तेहि मूळचे इनाम-हिस्सेदारच. त्यांच्या असहाय्य अज्ञान दशेंत त्यांचा इनामाचा अधिकार इतरांनीं बळकावला होता तो आतां ते सज्ञान आणि समर्थ झाल्यानें त्यांचा त्यांना देऊन टाकायचा आहे.

**मर्यादित मालकी**:-याचा अर्थ असा होतो कीं, यापुढें जमिनीचे सर्वस्वीं मालक असे कोणीच राहणार नाहींत. जमीन ही माणसाच्या मालकीची वस्तु नव्हे. भूमिहीनांना जमीन मिळेल तीहि मालकी हक्कानें नव्हे, तर केवळ " लायकी हक्कानें." जोंपर्यंत ते त्या जमिनीची योग्य मशागत करतील आणि निर्वाहाचें अन्य साधन त्यांच्याकडे नसेल तोंपर्यंतच त्यांच्याकडे जमीन राहील. त्यांना ती विकतां येणार नाहीं किंवा खंडाला लावून स्वत: अन्य व्यवसायासाठीं निघून जातां येणार नाहीं.

याचाच अर्थ, सबै भूमि गोपालकी-सारी जमीन देवाची, म्हणजे गांवाची किंवा समाजाची, सर्वांची. सर्वांच्या सोयीच्या दृष्टीनेंच तिची वांटणी व्हावी किंवा सामुदायिक रीत्या तिची कसवट व्हावी. तिच्यावर कोण्या एकट्या-दुकट्याला खासगी हक्क चालवितां येणार नाहीं. आजवर जमीन हें पैसे गुंतविण्याचें विनवास्त साधन होतें तसें तें यापुढें राहणार नाहीं

**मालकी विरुद्ध लायकी**:-साम्राज्यशाही किंवा राजेशाही मागें टाकून आपण लोकशाहीची वाट चालत आहों. याचा अर्थ असा कीं, आतां मालकीची जागा लायकी घेणार आहे. मालकी ही वारसा-हक्कानें उतरते, लायकी ही ज्याची त्यानें कमवायची असते. आजवर राजाचा मुलगा राजा, दिवाणाचा मुलगा दिवाण, कोतवालाचा मुलगा कोतवाल व पट्टेवाल्याचा मुलगा पट्टेवाला हा अन्याय चालला, कारण लायकी सुद्धां औरस संबंधानेंच उतरते अशी समजूत होती. लायकी वंशावर ठरे आणि नालायकीहि वंशावर ठरे. " जरी ब्राह्मण झाला भ्रष्ट । तरी तिन्ही लोकीं श्रेष्ठ " ही ब्राह्मणे-

तरांचीहि भोळी समजूत होती. उलट "शूद्राला संस्कृत उच्चार करतांच यायचे नाहींत ( त्याला वेदांचा अधिकार नाहीं याचा एवढाच अर्थ संभवतो, कारण वेदांचा अर्थ कोणीच करायचा नसतो ! ) अशीहि कल्पना होती. परंतु आतां या साऱ्या समजुती चुकीच्या आहेत असें शाबीत झालें आहे. आतां आनुवंशिक मालकीची बहुतेक क्षेत्रांतून हक्कालपट्टी झालेली आहे. पूर्वीं देशमुखाचा मुलगाच देशमुख होई. पण आतां कलेक्टराच्या मुलाला कारकुनीहि पत्करावी लागते आणि पट्टेवाल्याचाहि मुलगा त्याच्यावर कलेक्टर बनून येतो. लोकशाहीचा म्हणजे लायकीनुसार अधिकाराचा, अंमल सर्वत्र प्रस्थापित झाला आहे. फक्त सर्व नंबरांचीं राज्यें अद्याप आनुवंशिक हक्कानें चालत आहेत. अर्थात् त्यांचीहि वेळ आतां भरली आहे.

----×----

## द्रौपदीची कहाणी

माझ्या मागील विवेचनावर कोणी आक्षेप घेईल कीं, "ज्यांनीं आपल्या कष्टाच्या कमाईचा पैसा ओतून व प्रसंगीं इतरांकडूनही कर्जाऊ रकमा घेऊन अलीकडेच जमिनी खरेदी केल्या अशा मालकांचा यांत विश्वासघात होतो. ते भाड्याच्या चाळी बांधते व शेअर खरेदी करते, किमानपक्षीं पैसे बँकेंत ठेवते तर त्यांना निर्वेध उत्पन्न मिळत गेलें असतें आणि केव्हांहि भांडवल मोकळें करतां आलें असतें. पण तुमच्या भूदान-यज्ञापायीं आणि सरकारच्या या षष्टांश खंडाच्या आणि इतर जाचक कायद्यांपायीं आतां जमिनी विकायला काढूनहि कोणी घ्यायला धजत नाहीं, खंडाचेंहि उत्पन्न येत नाहीं आणि जमिनदार वर्गच तेवढा चिरडला जात आहे."

वरील आक्षेपांत तथ्यांश आहे, तेवढा आम्हांलाहि मान्य आहे आणि या नवीन धोरणामुळें कांहींची अडचण होते, त्यांच्याबद्दल आम्हांला सहानुभूतिहि आहे. परंतु कोणतीहि सुधारणा म्हणजे एक प्रकारची क्रांतीच असते. आणि क्रांतीच्या फेऱ्यामध्यें कांहीं व्यक्ति किंवा वर्ग चिरडलेहि जातात. अशांना नुकसानभरपाई म्हणून नव्हे पण टिकाव धरण्यासाठीं कांहीं साह्य व मार्गदर्शन समाजानें, किंवा सरकारनें, करावयास पाहिजे. जे सुधारणेचा

पुरस्कार करतात त्यांनीं त्या सुधारणेपायीं कांहींना भोगाव्या लागणाऱ्या अडचणींचा परिहार करण्यासाठींसुद्धां झटलें पाहिजे हें आम्ही आमच्यापुरतें मान्य करतों. मात्र त्या आपद्ग्रस्तांनींहि स्वतःच्या संकुचित स्वार्थासाठीं सुधारणेला विरोध करण्याचें पाप करूं नये. उदा० दारूबंदीमुळें आजवरच्या दारूवाल्यांचा धंदा बसला आणि ते बेकार झाले. पण दारूबंदीची चळवळ त्यांना मारण्याच्या हेतूनें केलेली नाहीं, तर लोककल्याणाच्या दृष्टीनेंच केलेली आहे, म्हणून त्यांनींहि आपल्या अन्याय्य स्वार्थाखातर त्या शुभ कार्याला विरोध करूं नये. त्याचबरोबर सरकारनें व समाजानेंहि त्या वर्गाला अन्य उपयुक्त धंद्यांत जम बसविण्यास मदत केली पाहिजे. भारताला स्वराज्य मिळाल्यामुळें, देशी राज्यें विलीन झाल्यामुळें आणि सध्यांच्या गोवा-मुक्तीच्याहि चळवळीमुळें काय थोडयाथोडक्या लोकांची अडचण झाली असेल व होत असेल ? पण सामाजिक न्यायाखातर हे आतां अन्याय्य ठरलेले स्वार्थ बाजूला सारणें प्राप्तच होतें व आहे. तसेंच भूदान यज्ञापायीं कोणी अडचणींत सांपडत असेल तर त्यानेंसुद्धां विवेक करावयास पाहिजे.

जमीन ही खासगी मालकीची वस्तु नव्हे, खरेदी-विक्रीची वस्तु नव्हे, हा सध्यां नवीनसा विचार असला तरी असलेच नवीन नवीन विचार मानव-समाजानें यापूर्वींहि वेळोवेळीं स्वीकारून सुधारणेची म्हणा किंवा क्रांतीची म्हणा (दोन्ही एकच) पावलें टाकीत प्रगति केलेली आहे.

उदा० स्त्री हीसुद्धां एके काळीं मालकीची किंवा देवघेवीची वस्तु किंवा इस्टेट मानली जात होती. पण आतां ती तशी मानली जात नाहीं. महंमद पैगंबरापूर्वी अरब लोकांमध्यें अशी वहिवाट होती कीं, बापाच्या मृत्यूनंतर मुलाला इतर इस्टेटीबरोबर त्याच्या सावत्र आयाहि पत्नी या नात्यानें मिळत! आपल्याकडेहि विधवा भावजयीशीं दिरानें लग्न करण्याची वहिवाट होती. पांडवांनीं तर द्रौपदीला जुगारांत पणाला लावली आणि हरले; तेव्हां द्रौपदी अंगावरील कपडयांदागिन्यांनिशीं दुःशासनाच्या ताब्यांत गेली आणि तो त्या मालकी हक्काच्या आधारें भर सभेंत तिची विटंबना करूं लागला. पांडव महाशूर होते, परंतु करारानें त्यांचे हात बांधलेले होते. कौरवांना कराराच्या कायद्याचा दृढ आधार होता. प्रचलित मानवी कायद्यापुढें द्रौपदीचा नाइलाज

होता. अशा प्रसंगीं तिनें ईश्वरी कायद्याचा धांवा केला. भगवान् श्रीकृष्ण धांवून आले आणि त्यांनीं जुगाऱ्यांमधील करार मोडून काढून द्रौपदीला तिच्या पतींच्या स्वाधीन केली.

तशीच ही भूमि म्हणजे माता. शेतकरी हे तिचे औरस पुत्र. या औरस पुत्रांनीं कदाचित् पोटासाठीं, कदाचित् व्यसनाकरितां किंवा जुगाराकरितांहि काढलेल्या कर्जाच्या व व्याजाच्या पोटीं तिला सावकाराला विकून टाकली असेल. सावकाराचें तिच्यावर कायदेशीर स्वामित्व प्रस्थापित झालेलें आहे. पण ती आपल्या सुटकेसाठीं प्रभूचा धांवा करीत आहे.

आणि तो प्रभू कोठून दुरून वैकुंठांतून गरुडावर बसून नाहीं येणार ! सज्जनांचें हृदय हेंच ईश्वराचें वसतिस्थान आहे. मनुष्यमात्र सज्जनच आहे. सावकाराच्या हृदयामध्येंहि प्रभु निद्रिस्त आहे. त्या प्रभूला जागें करण्यासाठीं ही भूपाळीच आम्ही आळवीत आहों. आमची भक्ती खरी असेल तर प्रभू धांवून येईल आणि भूमिमाता आणि तिचीं अपत्यें यांची ताटातूट दूर करील.

हिमालयांत पंगवाल नांवाची एक छोटी आदिवासी जमात आहे. तींत स्त्री–पुरुषांचें प्रमाण तेरा पुरुषांमागें बारा स्त्रिया असें पडतें. शिवाय अनेक बायका करण्याची चाल सर्रास चालू आहे. परिणामीं निम्मे पुरुषांचीं लग्नें होतात आणि बाकीच्यांना सक्तीनें ब्रह्मचारी व्हावें लागतें ! यांतून अनाचार व अनर्थ उद्‌भवणें अपरिहार्यच आहे. त्या जमातीच्या पुढाऱ्यांना अलिकडेच त्या चालीची अनिष्टता जाणवूं लागली आहे.

स्त्रियांच्या विषम वांटणीइतकीच जमिनीची विषम वांटणी सुद्धां अनर्थावहच आहे. आणि आपल्याकडे तेलंगणांत ती विषमता दूर करण्याचाहि तितकाच अनर्थकारक प्रयत्न चाललाहि होता. पण भारताचें सद्‌भाग्य कीं विनोबांचा वेळींच उदय झाला आणि ते त्या प्रयत्नाला कल्याणकारी मार्ग लावून देऊं शकले.

# गुलामगिरीचें आख्यान

स्त्री ही एके काळीं विक्रीची वस्तु होती, त्याचप्रमाणें पूर्वी आई-बाप मुलें-मुद्धां विकीत असत. गुलामगिरीची पद्धत अशीच उद्भवली. एखाद्या गरीबाला मुलेंबाळें आहेत पण त्यांना खाऊं घालण्याचें त्याला सामर्थ्य नाहीं. मुलांचे हाल पाहवत नाहींत. बापाला मूल विकण्याची हौस थोडीच असते ? पण घरीं त्यांचे हाल पाहण्यापेक्षां त्यांच्यापैकीं एखाद्या जाणत्या मुलाला विकून टाकला तर तोहि अन्नाला लागेल आणि त्याच्या किंमतींतून घरच्या इतर मुलांनाहि कांहीं काळ जगवितां येईल, असा हिशेब करून गरीब अडाणी आई-बाप आपलीं मुलें सावकारांना विकीत.

आणि हा सौदा उभयपक्षीं फायदेशीरच असे. बापाला पैसे मिळाले, विकलेला मुलगा अन्नाला लागला; कपडालत्ता, घोंगडी, पायतण, आंथरूण-पांघरूण, कधीं आजारी पडला तर औषधपाणी, कशाचीच वाण राहिली नाहीं; सावकारालाहि अल्प किंमतींत कायमचे व हुकमी असे एकच नव्हे; तर दर पिढीला एकाचे पांच, पांचाचे पंचवीस असे वाढत जाणारे गडी मिळाले ! म्हणून धनी गुलामाला चांगलें खाऊं पिऊं घालून धष्टपुष्ट करी—आम्ही बैलाला करतों त्याहूनहि अधिक आस्थेनें ! त्याचें लग्नहि करून देई. स्वत:कडे गुलामांची जास्त संख्या झाली तर त्यांतील पाहिजे तेवढे ठेवून बाकीचे विकून टाकी. तिकडूनही पैसे होत. बहुतेक धनी गुलामांना ममतेनें वागवीत आणि गुलामहि धन्याबद्दल कृतज्ञ राहत आणि इमानानें काम करीत.

ही गुलामगिरीची पद्धति शतकानुशतकें सुखानें नांदली, वाढली, पसरली. गुलामांची मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री होत असे, गुलामांची खरेदी-विक्री करणारे दलालहि होते, त्यांचा आंतरराष्ट्रीय व्यापार चाले.

पण पुढें या पद्धतीला उतरती कळा लागली. धनी आपल्या एकट्या-दुकट्या गुलामाला दयाळूपणें वागवीत, पण धंदेवाईक दलालांचें दया करून भागण्यासारखें नसे, आणि त्यांतूनहि गुलामहि आता पूर्वीचे राहिले नाहीं. त्यांना शिंगें फुटलीं ! बापाच्या घरीं कशी उपासमार होई आणि धन्याकडे आल्यापासून अन्नपाण्याची कशी सोय झाली तें आतां मूळ गुलामाचे नातू-

७९८८
का. क.



पणतू विसरले. ते हिशेब करूं लागले—माझ्या आजाला धन्याच्या आजानें ९० वर्षांपूर्वी ४० रुपयांना विकत घेतलें. प्रथम एक, पुढें पांच, अलीकडे आम्ही पंधरा गडी त्याचें दिवस-रात्र काम करतो आहों. रोज जेवून खाऊन २ आणेच मोजले तरी या ९० वर्षांत त्याचे ४० रुपये फिटले नाहींत का? आम्ही काय म्हणून याचीं फुकटचीं कामें करावीं? असें म्हणून ते कामांत अळंटळं करूं लागले. त्यामुळें सावकारांना गुलामांकडून काम घेणें परवडेनासें झालें. गुलामांपेक्षां स्वतंत्र रोजमजूर बरे म्हणण्याची वेळ आली. "हे खाणार रोज रुपयाचें, काम करणार बारा आण्यांचें आणि त्यासाठीं देखरेख व व्यवस्था यांचाच खर्च तेरा आण्यांचा. त्यापेक्षां त्यांना दिलेली किंमत एकदांच पाण्यांत गेलेली पत्करली. हे पळून जातील तरी बरें." परंतु ते पळूनहि जात ना आणि कामहि करीत ना! समुद्रमार्गे गलबतांतून परमुलखी निर्यात होत असतांना कांहीं गुलाम जिवावर उदार होऊन समुद्रांत उड्याहि घेत. हातांपायांत जड बेड्या असल्यानें ते सरळ तळाशीं जात आणि त्यांना सोडविणेंहि अशक्य होई. अशानें बिचाऱ्या दलालांचें नाहक नुकसान होई! त्यामुळें तेहि त्या व्यापाराला झटेनासे झाले.

इकडे सहृदय मालकांना, आणि विशेषतः आमच्यासारख्या कफल्लक समाजसुधारकांना, गुलामांची परवशताहि बघवेना. घरीं गुलामांची संख्या वाढली म्हणजे मालक त्यांतील दोन तगड्या भावाभावांना आठवड्याच्या बाजारांत विक्रीसाठीं पाठवी. भिन्न दिशांचे दोन गिऱ्हाईक दोन भावांना विकत घेऊन दूरच्या आपापल्या घरीं नेऊं लागत. आपण बैल विकतों तसाच व्यवहार घडे. परंतु बैल आपसांतील नातें ओळखीत नाहींत. त्यांची आईसुद्धां आपल्या पोटच्या वासरांना त्यांचें दूध सुटतांच विसरून जाते. माणसाचें तसें नाहीं. त्याला कुटुंबप्रेमाची जाणीव असतें. बाजारांत विकलेले गुलामबंधू आणि त्यांची आई एकमेकांना मिठ्या मारून, "आतां परत या जन्मीं परस्परांची नजरभेटहि होणें कठीण" या विचारानें आक्रंदूं लागत. त्यांचा तो आक्रोश ऐकून आसपासच्या लोकांनाहि गहिंवर येई आणि "गुलामगिरीची ही पापी प्रथा नष्ट व्हावयास पाहिजे" असें ते मनाशीं ठरवीत.

अशा तऱ्हेनें गुलामगिरीच्या प्रथेचें आयुष्य संपलें. धन्याला ती आर्थिक दृष्टया परवडेना आणि पारमार्थिक दृष्टयाहि पटेना. खुद्द गुलामांना त्यांची गुलामगिरी शरीरसुखाच्या दृष्टीनें जाचकच होती असें नाहीं; नियमित काम, पोटभर अन्न, अंगभर कपडे, कसलीहि वाण नाहीं, चिंता नाहीं! उलट अमेरिकेंत जेव्हां गुलामगिरीला कायद्यानें मनाई झाली व मालकांनीं गुलामांना डिसमिस् केलें तेव्हां अनेक गुलाम रडलेसुद्धां. जन्मांत जे कधीं स्वतःच्या जबाबदारीवर राहिलेले नव्हते त्यांना त्यांच्या स्वातंत्र्याचीच मोठी फिकीर वाटली. कोठें राहावें? काय खावें? सगळयाचीच आतां पंचाईत! जन्मभर आमच्या गोठयांत नांदलेल्या बैलाला जर आपण एके दिवशीं म्हटलें कीं, 'हे नंदी, आजवर आम्ही तुझ्या खांद्यावर जोखड घालून तुला गुलामाप्रमाणें राबविला, पण आतां आम्हांला त्याचा पश्चात्ताप वाटतो. आज २६ जानेवारी, स्वातंत्र्यदिन, आहे. तरी आजपासून तुला पूर्ण मोकळा करतों. खुशाल कोठेंहि फीर, चर, राहा. आमचें तुझ्यावर कसलेंच बंधन नाहीं. आम्हांला गरज लागेल तेव्हां आम्ही तुला नांगर किंवा गाडी ओढण्यासाठीं रोजमजुरीवर बोलवूं. तुला परवडलें तर ये, नाहींपेक्षां मर्जी लागेल तिकडे जा.' तर तो बिचारा कोठें जाणार? दिवसभर इकडे तिकडे वेळ काढून संध्याकाळला परत दाव्यावरच येणार. तशीच गत गुलामांची झाली. अर्थात् त्यांची जी सुटका करण्यांत आली ती त्यांच्या शरीरसुखासाठीं नव्हे, भूतदयेस्तव नव्हे, तर सक्तीनें मानवतेच्या तगाद्यास्तव करण्यांत आली. सुटका गुलामांची नव्हे, मालकांचीच झाली!

खंडजीवी जमीनमालकांना मला हेंच समजावून द्यायचें आहे कीं, या भूदान-यज्ञानें तुमचें कांहीं हिरावून घेण्याचा आमचा इरादा नाहीं, भूदान-यज्ञ हा तुमचें कांहीं घेण्यासाठीं नव्हे तर तुम्हांलाहि कांहीं देण्यासाठींच निघालेला आहे; तुम्हांला पेंचांत धरण्यासाठीं नव्हे तर तुमचा पेंच सोडविण्यासाठीं आहे.

काळ झपाटयानें बदलतो आहे. काळाबरोबर माणसेंहि बदलत आहेत. कुळें पूर्वींचीं राहिलीं नाहींत, धनी पूर्वींचे राहिले नाहींत आणि जगहि पूर्वींचें राहिलें नाहीं. पूर्वींच्या काळांत जें जुळलें, शोभलें, नांदलें तें नव्या काळांत नांदणार नाहीं, झेंपणार नाहीं, आणि शोभणार तर नाहींच नाहीं.

गुलामगिरी संपली, तिची जागा कुळगिरीनें घेतली. पण कुळगिरींत गुलामगिरीचीं जोखमें तेवढीं सारीं आहेत आणि सुखें मात्र कोणतींच नाहींत. धूर्त धन्यांनीं गुलामांना वेगळें टाकलें. वडील भाऊ धाकट्या भावाला वेगळा टाकतो तसेंच. पण त्यांना पोटापुरती जमीन तोडून दिली नाहीं. या फेरबदलांत त्यांनीं स्वतःचा मतलबच साधून घेतला. कुळांना जमीन वर्षावर्षापुरती खंडानें दिली. पूर्वीं गुलामाच्या पोटापाण्याची चिंता मालकालाच वाहावी लागे. आतां त्याला काय उरतें, त्याचें पोट तरी भागतें कीं नाहीं त्याची जोखीम धन्यावर राहिली नाहीं. शेती परवडो वा ना परवडो, शेत पिको वा बुडो, धन्याच्या खंडाला मरण नाहीं. कुळाला गुलामाची जोखमें तेवढीं सारीं उठवावीं लागतात आणि सुखें मात्र कोणतींच नाहींत. गुलामाला स्वातंत्र्य मिळालें खरें, पण तें स्वतंत्रपणें जगण्याचें नव्हे तर स्वतंत्रपणें उपाशी मरण्याचें !

प्रत्येक धनी मोठ्या कळवळ्यानें सांगत असतो कीं, मी माझ्या कुळांना नाना प्रकारें दया दाखवितों, वाटेल तेवढी सूटसांड द्यायला तयार असतों. पण कुळें आतां पूर्वींचीं राहिली नाहींत. पूर्वीं तीच आम्हांला विचारायला येत "खंड घ्यायला कधीं येतां ? खंड घेऊन मला लौकर मोकळा करा. नाहींपेक्षां खंडासाठीं ठेवलेलें भात घरांतलींच माणसें खाऊन संपवतील." पण आतां आम्ही खंडवसुलीसाठीं खेड्यावर जातों तर कुळें तोंड दाखवायलासुद्धां तयार नाहींत. चार चार दिवस गांवभर खेटे घालूनहि आम्हांला रिकाम्या हातांनीं परतावें लागतें.

साहजिक आहे. पूर्वीं कुळें धन्याच्या अन्नाची असत. पण आतां धनीच कुळांच्या अन्नाचे आहेत, हें या दयाळू अज्ञानी धन्यांच्या लक्षांत येत नाहीं ! धनी म्हणतो, "मी दयाळू" कुळें म्हणतात "ही जळू !" "माझ्या बायकापोरांनीं उन्हापावसांतून कष्ट करून भात पिकवावयाचें आणि मी तें त्यांच्या तोंडचें काढून शेवटीं या धन्याच्या दारांत कां म्हणून ओतावयाचें ? माझ्या आजानें बैल घेण्यासाठीं सावकाराकडून ४० रु. घेतले त्यावर व्याज चढून शेवटीं त्या कर्जापोटीं सावकारानें माझें हें सोन्यासारखें शेत खरेदी घेऊन मला कूळ बनविलें. त्यानंतरसुद्धां गेल्या ४० वर्षांत खंडाच्या

रूपानें मी त्याला ४००० रुपये तरी भरले असतील. याउपर मी त्याचें कांहीं देणें लागत नाहीं." परिणामीं खंडवसुलीपायीं धन्याच्या पदरीं धान्य पडतच नाहीं पण शीण आणि शिव्या मात्र वारेमाप पडतात.

आज किती तरी घराणीं केवळ जमीनमालकीपायीं धुळीस लागतांना दिसत आहेत. तुमचा धंदा काय? तर म्हणें "खात्याची वहिवाट." कागद-पत्र, उतारे, नकला, बेलीफ, तलाठ्यांची सरबराई, कोर्टकचेऱ्यांचे खेटे, सावकारांचे तगादे, भाऊबंदकी, इत्यादीपायीं बिचाऱ्यांचा दम निघतो. आणि हें सारें सोसायचें कशासाठीं? तर शेजाऱ्यांचें शत्रुत्व संपादिण्यासाठीं. जमीनजुमला आहे म्हणून मुलांबाळांना शिक्षणहि दिलें नाहीं आणि कामाधामाला मोलकरणी-गडी असल्यामुळें इकडची काडी तिकडे करण्याची धमकहि राहिलेली नाहीं. बडेजावी चालविण्यासाठीं कर्ज झालें आणि जमीनजुमला गहाण पडला. अशीच स्थिति बहुसंख्य खंडजीवी धन्यांची झालेली आहे. गुलामगिरीपायींच रोमची संस्कृति लोप पावली. तशीच गत हरएक परोपजीवी वर्गाची झाल्याखेरीज कशी राहील? या नियतींतून मालकवर्गाला वांचविण्यासाठीं भूदान-यज्ञ आहे.

**निःशूद्र पृथिवीः**—आजवर मानवजातीच्या भिन्न भिन्न वंशांमध्यें, व घराण्यांमध्यें बुद्धि, भावना व कर्तृत्व यांचा विकास भिन्न प्रमाणांत व भिन्न प्रकारें झालेला होता हें खरें. कमी जास्त विकासाच्या त्या त्या अवस्थेंत मालक व गुलाम, धनी व कूळ, मुकादम व मजूर, राजा व प्रजा इत्यादि नातीं यथायोग्यच होतीं. पण आजचा काळ हा समतेचा आहे, बंधुतेचा आणि सहकार्याचा आहे. आता कसलीहि विषमता खपणार नाहीं. आपले हे कनिष्ठ बंधू आतां सज्ञान झाले असून समाईक इस्टेटीचा हिस्सा मागत आहेत. तो वरिष्ठ वर्गांनीं संतोषपूर्वक दिला पाहिजे. कनिष्ठांना कनिष्ठपणा खपणार नाहीं त्याहूनहि खुद्द वरिष्ठांना वरिष्ठपणा खपणार नाहीं. राजांनाच प्रभुत्वाची व ब्राह्मणांना वर्णगुरुत्वाची शिसारी आलेली आहे.

माझी स्वतःची तर दृढ प्रतिज्ञा आहे कीं, पृथिवी निःशूद्र व्हायला पाहिजे. शूद्र म्हणजे दास. पण आम्ही आतां दासांचें तोंडहि पाहूं इच्छीत नाहीं. तेली-माळी-महार-कुणबी हे तर माझे सख्खे भाऊ. ते स्वतःच्या पदरीं

हीनपणा बांधून घेण्यास तयार असले तरी मी तो त्यांना बांधूं देणार नाहीं. कारण मी स्वतःच्या अंगाला उच्चपणाहि चिकटूं देण्यास तयार नाहीं. उच्चपणा हा सुद्धां एकप्रकारचा कलंकच आहे. हा महार आहे असें कळतांच त्याच्याबद्दल कोणी तुच्छ भाव दाखवूं लागला तर त्या महाराला राग येईल; तसाच मी ब्राह्मणवंशांत जन्मलों एवढ्याबद्दलच जर कोणी मला मान देऊं लागला तरीसुद्धां मला तो अपमानच वाटतो. कारण मला व्यक्तिशः कांहीं किंमत नाहीं असा त्याचा अर्थ होतो !

शूद्र म्हणजे सांगकामे. आजच्या समतेच्या युगाला सांगकामे व कामसांगे ही दुफळी मानवणारी नाहीं.

मनुष्यमात्रामध्यें परमार्थाची ओढ असतेच. ही पारमार्थिक ओढ कुळाला कूळ किंवा मजुराला मजूर राहूं देण्यास राजी नाहीं. आमच्या गोपुरीमध्यें लोक काम मागायला येतात. त्यांना मी सांगण्याचें योजिलें आहे कीं तुम्ही आमच्या भागींत काम करा. नाहीपेक्षां तुम्हांला स्वतंत्र जमीन देतों ती कसा आणि आम्हांला खंड न देतां मिळेल तें खा, पण आम्हांला मजूर नकोत.

सारांश, पारमार्थिक दृष्ट्या मालक–मजूर द्वंद्व मोडून टाकावयास पाहिजे आहे. आणि आतां अशी वेळ आलेली आहे कीं, मालकांचा स्वार्थहि त्यांतच आहे. मालक–मजुरांचा कर्मधारय समास * झाल्याखेरीज आतां काम होणारच नाहीं. कुळांकडून खंड वसूल करणें, तसेंच मजुरांकडूनहि काम घेणें अलीकडे अडचणीचें व आंतबट्ट्याचें झालें आहे व होत आहे. बंधुता व सहकार्य हाच त्यावर इलाज आहे. मालकाला हवें असतें काम, पण मजुराला पाहिजे असतो दाम. आणि मग दोघांचीहि जुंपते कुस्ती. आतां मालकानेंच मजूर बनलें पाहिजे आणि मजुराला मालक बनविला पाहिजे. त्यांनीं समपातळींत यावें. मग एकत्र भागीनें काम करावें कीं पृथक् पृथक् तो सोयीचा व ज्याच्या त्याच्या आवडीनिवडीचा प्रश्न राहील.

* टीपः–मालक–मजूर=मालक व मजूर हा द्वंद्व समास. मालक तोच मजूर हा कर्मधारय समास. आईबाप हा द्वंद्व समास; माय-बाप (सरकार) हा कर्मधारय. द्वंद्व याचा झगडा असा अर्थ आहे. कर्मधारय=काम पार पाडणारा.

**व्याजबट्टाः**-आपण मागें पाहिलेंच कीं, जमीनमालकीचा एक प्रकार बळकावणीचा आहे, पूर्वीच्या सतत युद्धांच्या व धामधुमीच्या काळांत 'बळी तो कान पिळी ' हाच न्याय प्रभावी असे. विजेते आपल्या सरदारांना मोठ-मोठ्या जहागिरी बहाल करीत; कांहींना देशमूख, देसाई, इनामदार, खोत इत्यादि बनवीत. ते ते अधिकारी राजसत्तेच्या आणि स्वतःच्या मनगटाच्या बळावर आपापल्या प्रदेशांतील रयतेवर दरारा चालवून कर व वेठ वसूल करीत. भूमीवरील स्वामित्वाच्या इतिहासाचा हा भाग निर्विवाद आहे.

पण या खेरीज दुसऱ्या एका सदनशीर व साळसूद प्रकारानेंहि शेतकऱ्याच्या जमिनी हळूहळू सावकाराच्या व श्रीमंतांच्या ताब्यांत गेल्या. तो प्रकार सावकारी व व्याजबट्टा यांचा होय. त्याच्याहि मुळाशीं अल्पस्वल्प दंडेली नसेल असें नाहीं; पण उद्योग, काटकसर, दूरदर्शीपणा, संयम इत्यादि सद्‌गुणहि लोभाच्या तावडींत सांपडल्यानें अनर्थावह कसे होतात त्याचे व्याजबट्टयाची सावकारी हें ठळक उदाहरण आहे.

मुळांत कसेल त्याचीच जमीन होती खरी, पण त्यांतहि प्रथम आले त्यांनीं चांगली आणि भरपूर जमीन बळकावली आणि मागाहून आले त्यांच्या वांटचाला तुटपुंजी, निकृष्ट जमीन आली. जो तो आपापल्या जमिनीचा धनी असे आणि कोणी कोणाचें कांहीं लागत नव्हता. पण निकृष्ट शेतकऱ्यांना श्रावण-भाद्रपदांत अन्नाचा तुटवडा पडला कीं, सुखी शेतकऱ्या-कडे मदतीची याचना करावी लागे. यांतून दुसऱ्याच्या अडचणीचा गैर-फायदा घेण्याच्या लोभी वृत्तीला संधि मिळाली, म्हणजे शोषक सावकारी निघाली. सावकारीचे पोषक व शोषक, उपकारक व अपकारक, धर्म्य व अधर्म्य, आंतबट्टयाची व व्याजबट्टयाची दोन्ही प्रकार जगांत चालत आलेले आढळ-तात. धर्म्य सावकारी ती कीं जी शेजाऱ्याच्या अडचणीच्या प्रसंगीं साह्याला धांवून येते आणि ऋणकोला बिकट प्रसंगांतून निभावून नेण्यांतच कृतार्थता मानते. पण ही सावकारी आंतबट्टयाची असते. अशी उपकारक सावकारीहि जगांत नित्य व सर्वत्र चालत आलेली आहे. पण तिला संघटित धंद्याचें रूप कधींच येत नाहीं किंवा कोर्टकचेऱ्यांतहि ती कधीं फिरत नाहीं. या सावकारींत व्याज नसतें, उलट मुदलांतहि कांहीं सूट देण्याची वहिवाट

आहे. आणि ती रास्तहि आहे. माझें भागून उरलेलें धान्य शेजाऱ्यानें उसनवार नेलें नसतें तर उंदीर--घुशीच खाणार होत्या किंवा सडून जाणार होतें. अर्थात् वर्षभरानें मला ताजें धान्य परत देतांना त्यानें तें मणाचें पंधरा पायलीच परत देणें वाजवी होईल.

पण शोषक सावकारी मात्र सवाई घेते. त्यामुळें ज्या गरीब शेतकऱ्याला पहिल्या वर्षीं एका मणाचा तुटवडा आला त्याला पीक कापतांच त्या अपुऱ्या पिकांतूनहि १। मण काढून द्यावें लागतें व परिणामीं पुढील वर्षीं २। मणांची तूट येऊन परत त्यावर ९ पायली व्याज द्यावें लागतें. तिसऱ्या वर्षीं तूट ३ मण १३ पायल्यांची व त्यावर व्याजाच्या १५। पायल्या अशा तऱ्हेनें ऋणकोचा प्रपंच अधिकाधिक घसरत जाऊन अखेरीस सावकार त्याची जमीनच खरेदी घेऊन व्याजाऐवजीं खंड घेऊं लागतो. ज्याचें संबंध पिकांत भागत नव्हतें त्याचें आतां खंड भरून उरलेल्या पिकांत भागावें कसें ? अर्थात् त्याला बैलजोडीहि विकून कुळाचा मजूर बनावें लागतें आणि पूर्वींच्या काळीं क्रमाक्रमानें मुलेंहि विकावीं लागत ! असा हा गरीबांचा प्रपंचच बिनबुडाचा बनतो. तिकडे सावकारहि जातीनें शेती करण्याचें सोडून खंडवसुली आणि भरीला मजुरांकरवीं शेती करूं लागतो. पण अंमळशा वेळानें तो खेड्यांतील रूक्ष जीवनाला कंटाळून शहराचीच वाट धरतो. तेथें त्याला वकिलीवर पैसा बरा मिळतो, खेड्यांतून व्याज व खंडहि मिळत जातो, आणि मुलालाहि बॅरिस्टरीसाठीं विलायतेस पाठवितां येतें. मुलगा बॅरिस्टर होऊन हायकोर्टाचीच संनद घेतो. आतां खेड्यांतील खंड व व्याज-वसुलीची कामगिरी तो कारकुनावर सोंपवितो. किंवा आपली खेड्यांतील इस्टेट नजीकच्या दुय्यम शहरांतील वकिलाला, पेन्शनरला किंवा आफ्रिकेंतून पैसे कमावून आणलेल्या गृहस्थाला विकूनच मोकळा होतो. अशा प्रकारांनीं शेतकऱ्यांच्या जमिनी सदनशीर मार्गानें सावकाराच्या किंवा श्रीमंतांच्या ताब्यांत जात असतात.

व्याजबट्टा म्हणजे जो अडचणींत सांपडला त्याला आणखी खोलांत ढकलणें, जो मागासला त्याच्या पायाला जड धोंड बांधणें.

धर्म्य सावकारी हरएक गरजवंताला कर्ज देईलच असें नाहीं तर केवळ योग्य कारणास्तवच देईल. दारू–जुगारासाठीं, आळसापायीं, किंबहुना लग्नासाठींहि, कर्ज मागणाराला तें नाकारणें हाच त्याच्यावर उपकार आहे. आकस्मिक आपत्तीसाठीं किंवा उत्पादक कामासाठीं उदा. विहीर खणण्यासाठीं, गडगा बांधण्यासाठीं किंवा बैलांच्या खरेदीसाठींच कर्ज देणें उचित. दर वर्षाला श्रावणांत खावटीसाठीं कर्ज देणें वाजवी नाहीं. नित्याच्या कर्जबाजारीपणावर आमूलाग्र उपचारच केले पाहिजेत. भूमिदान व ग्रामोद्योग हे संपूर्ण नसले तरी महत्त्वाचे व खात्रीचे उपचार आहेत.

शोषक, अर्थात् व्याजबट्टयाच्या सावकारीचा सर्व धर्मांनीं निषेधच केलेला आहे, इस्लामनें तर विशेषच. उपनिषदांतहि " शमलं कुसीदम् " व्याज हें पाप आहे असें वचन असल्याचें समजतें. ख्रिश्चन धर्मानेंहि व्याजबट्टयाचा निषेधच केलेला आहे. म्हणूनच युरोपांत ज्यू लोक सावकारीबद्दल प्रसिद्ध आहेत.

सामान्य माणसाला उद्योग व काटकसर करण्याची प्रेरणा मिळण्यासाठीं धनसंग्रहाची मुभा राहावी हें इष्ट आहे, तथापि तो संग्रह प्रमाणापलीकडे झाल्यास तो उद्योग व काटकसर यांस मारकहि होतो. संपत्तीचा फार संचय झाल्यानें आळस, विलास, ऐदीपणा व व्यसनें वाढतात. गरिबी, म्हणजे अन्नवस्त्रादींच्या वाजवी गरजा भागविण्याचेंहि जवळ साधन नसणें हें दुर्दैव खरेंच; परंतु उद्योगाची आवश्यकता राहाणार नाहीं एवढी संपत्ति जवळ सांठणें हें त्याहूनहि मोठें दुर्दैव आहे. स्वकष्टानें गरिबींतून डोकें वर काढलेल्या बापाच्या मुलांमध्यें बापाची उद्यमनिष्ठा व कर्तबगारी क्वचितच आढळते. म्हणून मुलाला वारशांत संपत्ति देणें म्हणजे त्याला विपत्तींत लोटल्याप्रमाणेंच आहे. जो बाप मुलाला निर्जीव संपत्तीचा नव्हे तर विद्या, चारित्र्य, पुरुषार्थ इत्यादि जिवंत संपत्तीचा वारसा ठेवील तोच त्याचा खरा हितकर्ता. त्याचेंच मुलांवर खरें प्रेम असतें. आपण ज्याला प्रेम प्रेम म्हणतों तो केवळ मोह असतो आणि हें असलें दुष्ट प्रेम न कळत का होईना पण मुलाचा बळी मात्र घेतें !

स्वतःच्या पूर्वपुण्याईवर आज, किंवा पूर्वजांच्या पुण्याईवर, या जन्मीं सुख भोगणें किंवा मोठेपणा मिरविणें म्हणजे एक प्रकारें स्वतःची सध्यां-

पुरती तरी नालायकी घोषित करणें होय. म्हाताऱ्यांनींसुद्धां आपल्या चालू चांगुलपणावर जगूं पाहावें हा उत्तमपक्ष, स्वतःच्या तरुणपणींच्या कर्तबगारीवर जगणें हा मध्यमपक्ष आणि वाडवडिलांच्या कर्तबगारीवर जगणें हा अधमपक्ष. जेव्हांचे तेव्हां ताजें खाणें हा उत्तम पक्ष, सकाळ-दुपारचें संध्याकाळपर्यंत खाणें हा मध्यमपक्ष, पण काल-परवांचें शिळें अन्न खाणें हें दैन्यच होय.

खंडाचें किंवा व्याजाचें उत्पन्न हें असलें शिळें अन्नच आहे. तें पथ्यकर नव्हे, मारकच ठरतें. स्वहिताला जपणारा धर्मनिष्ठ मनुष्य व्याजबट्टयाची शोषक सावकारी करणार नाहीं, प्रसंगीं आंतबट्टयाची पोषक सावकारी करील. आणि व्याजबट्टयावर संपादिलेल्या जमिनी ज्याच्या त्याला परत देऊन मोकळा होईल.

## प्रश्न, शंका, आक्षेप

**१. जमीनच कां?**

व्याज आणि खंड जर एकाच जातीचीं आहेत, तसेंच जमिनीच्या मालकीखेरीज खासगी मालमिळकतीचे आणखीहि नानाप्रकार आहेत मग तुमचा रोख फक्त जमिनीवरच कां? कसेल त्याची जर जमीन तर राहील त्याचें घर आणि चारील त्याची गाय कां नाहीं? संपत्तिसंचयावरहि बंधन कां नसावें?

**उत्तर**—संपत्तिसंचयावर बंधनें सध्यांहि आहेत व आणखीहि हळूहळू पडत जातील. खंडनियंत्रणाप्रमाणें भाडेंनियंत्रणाचाहि कायदा आहेच. 'सबै भूमि गोपालकी' प्रमाणें "सब संपत्ति रघुपति की आही" हेंहि विनोबाजी सांगतातच व भूदान–यज्ञाच्या मागोमागच संपत्तिदानयज्ञहि सुरू झालाच आहे.

तरीसुद्धां जमिनीच्या समान वांटणीचें विशेष महत्त्व आहे. कारण,

(१) जमीन ईश्वरनिर्मित आहे. माणसाला ती सहजीं मिळाली. इतर संपत्ति–घरें, दागिने, भांडीं, सामान मनुष्यानें स्वकष्टानें बनविलें आहे.

(२) जमीन मर्यादितहि आहे. संपत्तीच्या इतर प्रकारांत मागणीनुसार पुरवठा वाढवितां येतो. परंतु आतां बिनवारशी (म्हणजे जिच्यावर कोणी हक्क सांगत नाहीं अशी) जमीन राहिलेली नाहीं. आहे तिचीच वांटणी केली पाहिजे.

(३) जमीन हें प्रतिष्ठेचें साधन आहे. जमीनमालकीला आहे तशी प्रतिष्ठा निव्वळ पैशांच्या मालकीला नाहीं.

(४) जमीन वांटतां येते; इतर संपत्ति दडवितां येते, तशी जमीन दडवितां येत नाहीं.

(५) संपत्तीच्या इतर प्रकारांना चोराचें, आग, पाणी, वाळवी, कसर इत्यादींचें तसेंच बाजारभावांच्या चढउताराचें भय आहे, तें जमिनीला अगदींच कमी.

(६) जमिनीबद्दल माणसाला पराकाष्ठेचा जिव्हाळा वाटतो. तो जान देईल पण जमीन देणार नाहीं म्हणे. भूमीला आपण माता म्हणतों. तिची मांडी तिच्या साऱ्या बालकांना मिळाली पाहिजे.

(८) शेती हा सर्वश्रेष्ठ व्यवसाय आहे. इतर व्यवसाय एकांगी व कंटाळवाणे असतात. पण जेवणाराला भाताचा तसा शेतकऱ्याला शेतीचा कधींच कंटाळा येत नाहीं. हा श्रेष्ठ व्यवसायहि सर्वांच्या वांटयाला यावयास पाहिजे.

## २. भूदान कोणीं किती द्यावें?

१ एकर भातशेती व ४ एकर वरकस एवढी जमीन ५–६ माणसांच्या कुटुंबाला पुरेशी समजली पाहिजे.

आपल्या रत्नागिरी जिल्ह्यांत १७॥ लाख एकर वस्ती आहे आणि एकूण क्षेत्रफळ सुमारें ३० लाख एकर असलें तरी कातळ व कडे वजा जातां वाईट–बरी शेतीलायक जमीन सुमारें १३ लाख एकरच असेल असा अंदाज आहे. अर्थात् ५–६ माणसांच्या कुटुंबाला ५ एकर जमीन देऊन आपण या १३ लाख जमिनींत फार तर १४ लाख लोकांचीच सोय लावूं शकूं. अर्थात् जमिनीची समान वांटणी करायची तर याहून अधिक जमीन वांटयाला येऊं शकत नाहीं. त्याहून जास्त जमीन ज्यांच्यापाशीं आहे

त्यांनीं आपल्या जमिनीचा सहावा हिस्सा भूदानांत द्यावा; ज्यांच्यापाशीं भरपूर जमीन आहे किंवा ज्यांना निर्वाहाचें अन्य साधन आहे त्यांनीं त्या प्रमाणांत अधिक हिस्सा देणें शोभेल. तथापि जमीनवांटणीच्या तत्त्वाला मान्यता व त्या कार्यक्रमांतील पहिलें पाऊल म्हणून त्यांनींहि सहावा हिस्सा दिला तरी त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत.

ज्यांच्याकडे अपुरीच जमीन आहे त्यांनीं चिन्हरूप दान नैवेद्यादाखल थोडेसेंच दिलें तरी पुरें. कारण भूदान–यज्ञांत उलट त्यांना अधिक जमीन मिळावयास पाहिजे. अर्थात् अपुऱ्या जमिनीचे मालकहि शेती सोडून अन्य व्यवसायच करीत असतील तर त्यांनीं आपली सारी जमीनहि द्यावी. जमिनीची अडवणूक होऊं नये. भोगवटा कोणाचाहि असो तो निर्वेध असावा हें योग्य, सोयीचें व लाभदायक आहे.

दुसऱ्या एका दृष्टीनें मात्र मी म्हणतों कीं ज्यांच्याकडे तुटपुंजी जमीन आहे त्यांनीं अल्पदान देण्याऐवजीं सर्वदान द्यावें. कां तें सांगतों—

**सर्वदानः**—आज मालकीवर जगणारे व लायकीवर जगणारे असे नागरिकांचे दोन वर्ग पडतात आणि मालकीमुळें लायकीची कुचंबणा होत असते. लोकशाहीची परिपूर्णता व न्यायाचें राज्य होण्याच्या दृष्टीनें वंशसिद्ध मालकी म्हणून कसलीच असूं नये, ज्यानें त्यानें वाडवडिलांच्या नव्हे तर स्वतःच्या अंगच्या कर्तबगारीनेंच जगावें व उचित पद प्राप्त करावें हेंच न्यायाचें आहे. अर्थात्! मालकीपायीं ज्यांची लायकी चिरडली जात आहे अशा सर्वांनीं मालकीचा नायनाट करण्यासाठीं हिरीरीनें पुढें सरसावयास पाहिजे.

तुटपुंज्या जमिनीचे मालक त्या आपल्या मालकी हक्काच्या आधारें जगत नसतात, तर आपल्या लायकीवर, कर्तबगारीवरच जगत आहेत. मालकी नष्ट झाल्यानें त्यांचें कांहीं बिघडणार नसून त्यांच्या लायकीला अधिक वावच मिळणार आहे. मालकी त्यांना साधक नसून बाधकच आहे. म्हणून त्यांनीं ती सर्वस्वीं झुगारून देणेंच शहाणपणाचें होईल.

पोपटाला पकडण्याची पारध्यांची अशी एक रीत आहे कीं, तारेंत नळी ओवून त्या नळीलगत कांहीं खाद्य मांडतात. तें खाद्य खाण्याच्या

लोभानें पोपट त्या नळीवर पाय ठेवून बसतो. परंतु तो नळीवर बसतां क्षणीच नळी गोल घसरते व पोपट पायांनीं नळी घट्ट धरून उलटा टांगून राहतो. घाबऱ्या स्थितींत त्याला वाटतें कीं, पायांत घट्ट धरलेली नळी हाच आपला एकमेव आधार आहे! खरोखरीं त्यामुळेंच तो आयता पारध्याच्या हातीं मिळतो. ती नळी म्हणजे त्याचें बंधन असतें. पण तो मात्र तिला आपलें एकमात्र साधन मानतो !

तसेंच अपुऱ्या जमिनीचे–व अपुऱ्या बुद्धीचेहि––मालक म्हणतात, "आम्हांला एवढाच आधार आहे तोसुद्धां आम्हांला सोडून द्यायला सांगतां?" होय, कारण तो क्षणमात्र सुटतो. खालून वर उडी मारण्याप्रमाणेंच हें आहे. खालच्या आधाराचा त्याग केल्याखेरीज वर उडी पोंचणार कशी ?

कार्ल मार्क्सचे मार्मिक उद्‌गार येथें बरोबर लागू पडतात:—"जग-भरच्या शेतकरी–कामकऱ्यांनो, उठा, जागे व्हा व क्रांतीचें स्वागत करा. या उलाढालींत तुमचें जाऊन जाऊन जाईल काय? तर हातांपायांतील बेड्या. तुम्हांला मोबदल्यांत मिळेल पृथ्वीचें राज्य."

अजाण हरिजनसुद्धां आपापसांतील उच्चनीच भेदांना फार जपत असतात. महार मांगाला आणि मांग भंग्याला अस्पृश्य समजतो. तेवढीच त्यांची प्रतिष्ठा! म्हणून त्या चिमूटभर प्रतिष्ठेला ते प्राणापरीस जपतात. त्यांनाहि आम्ही समजावून सांगतों कीं, तुम्ही ही भुरटी प्रतिष्ठा झुगारून द्या म्हणजे मानवतेची सार्वभौम प्रतिष्ठा तुम्हांला लाभेल.

तंतोतंत तोच न्याय अपुऱ्या जमिनीच्या मालकांना लागू पडतो. परंतु परिस्थिति मिश्र असते. जमिनीच्या बाबतींत 'नाहींरे' वर्गांत मोडणारे ते व्यापार व्यवसायाच्या बाबतींत "आहेरे" हि असतील. शिवाय "मी न बदलतां जग बदलावें" ही वृथा आशाहि प्रत्येक जण उराशीं बाळगीत असतो !

सारांश हा कीं, अपुऱ्या जमीनमालकाचें हित, म्हणजे दूरदृष्टीचा फायदाच नव्हे तर स्वार्थ, म्हणजे तात्कालिक फायदाहि, सारी जमीन देण्यांतच आहे. ती जमीन कोठें जाणार नाहीं तर लायकी हक्कानें त्यांच्याकडेच राहील व

आपल्या भरीला अधिक जमीन घेईल. ज्यांचें जीवित मालकी हक्कावरच अवलंबून आहे त्यांनाच खरोखरीं आपली मोठी मालकी सोडणें अवघड होईल. परंतु हलक्या अंगाच्या मालकांनीं–आणि तेच बहुसंख्य आहेत–आपापले मालकी हक्क सोडले तर त्याचा सामुदायिक परिणाम फार प्रचंड होईल. आणि त्यांच्या अल्प अल्प जमिनींची बेरीजहि मोठमोठ्या जमीनदाऱ्यांहून मोठी होईल. आणि मोठे जमीनदारहि त्यांच्या उदाहरणानें प्रभावित होतील व त्यांनाहि जमीनी देणें प्राप्त होईल. भूदान यज्ञाच्या बाजूनें एक प्रचंड अहिंसक सेना खडी होईल व विरोधी शक्ती स्वखुषीनें शरण येतील.

अनुक्रम
विभाग
क्रमांक

### ३. " छोट्या तुकड्यांनीं उत्पादन घटेल."

घटण्याचें कारण नाहीं, उलट आपुलकीच्या हुरूपानें मातीतून सोनें पिकविलें जातें असाच अनुभव आहे. आज जमिनीच्या बाबतींत फार घोळ, बेबनाव आणि कुचंबणा चाललेली आहे ती थांबेल. पडित जमिनी लागवडीखालीं येतील. चीन जपानमध्येंसुद्धां छोटीं दोन दोन, तीन–तीन एकरांचींच वांटपें आहेत आणि तिकडे ते जोतेंसुद्धां वापरीत नाहींत, केवळ कुदळ–खोरीं हातानें चालवून मशागत करतात आणि आमच्या तिपटी-चौपटीनें पीक काढतात.

छोटचा छोटचा व गरीब मालकांना ट्रॅक्टर, एंजिनपंप यांसारख्या यांत्रिक साधनांचा फायदा घेणें परवडणार नाहीं हें खरें; पण ती अडचण सहकार्यानें दूर होऊं शकेल. आणि अडचणींतून त्याची आवश्यकता प्रत्येकाला जाणवल्यानें तें खरें मनःपूर्वक सहकार्य होईल व नीट नांदेल. हल्लीं सहकारी सोसायटचा चालतात. त्यांत सहकार्याचा केवळ फार्सच चालतो. खात्याच्या अंमलदारांनाही आंवळ्याची मोट संभाळतांना नाकीं नऊ येतात.

सहकार्य नांदत नाहीं त्या अर्थी कल्याणकारी भांडवलशाहीची एकहातीं सत्ता चालविणें बरें असें पुष्कळांना वाटतें. पूर्वी अकबरासारख्या भल्या बादशहांना देशाची सुव्यवस्था लागून परस्परांतील युद्धें व बेबनाव टळावे एवढ्यासाठींच साम्राज्यविस्तार करायचा होता, किंवा सध्यांसुद्धां रशिया-

अमेरिकासारख्या बलिष्ठ राष्ट्रांना साऱ्या पृथ्वीची ' व्यवस्था ' लावण्याचा हव्यास आहे. त्याच मासल्याचा हाहि प्रयत्न आहे. त्यांतील हित करण्याची लालसा सच्ची पण भोळी असूं शकेल तशी दांभिकहि असूं शकेल. शिवाय ती आजच्या काळाला मानवणारी नाहीं. साम्राज्यशाहींतहि अनेक फायदे होते. पण सध्याच्या काळांत सुटसुटीत हुकुमशाहीपेक्षां बोजड लोकशाहीच हितकर ठरली आहे. त्याप्रमाणें एकछत्रीं मालकीपेक्षां सुटी सुटी स्वतंत्र वहिवाटच श्रेयस्कर ठरते. एकछत्री व्यवस्थेनें उत्पादन घटेलच, पण वाढेल असें मानलें तरी त्यानें मानवता खुरटेल ही अधिक मोठी हानि आहे. मानवतेची खच्ची करून उत्पादन वाढविण्यांत काय हंशील ?

भूमीची वांटणी करण्यानें उत्पादन वाढेलच, पण वांटणी करण्यांतील प्रमुख उद्देश उत्पादनवाढ नव्हे तर सामाजिक न्यायाची स्थापना. सामाजिक न्यायाच्या स्थापनेनें सामाजिक सलोखा व समृद्धि हीं वाढीस लागतील हें निश्चित आहे. तथापि न्यायस्थापनेलाच सर्वोपरि महत्त्व दिलें पाहिजे आणि प्रसंगीं सलोखा तात्पुरता बिघडवूनहि न्यायस्थापना केली पाहिजे. आम्हीं इंग्रजांकडे स्वराज्य मागितलें तें उत्पादनवाढीसाठीं नव्हे, तर मानवतेच्या प्रतिष्ठेच्या स्थापनेसाठींच.

४. " **कम्युनिस्टांत आणि तुमच्यांत फरक तो कोणता राहिला ?** "

तसा त्यांच्या आमच्यांत विशेष फरक नाहीं; आणि कोणाशींहि फरक दाखविण्यांत आम्हांला स्वारस्यहि वाटत नाहीं. ते समतेचे भोक्ते आहेत, तसेच आम्हीहि आहों. पण ते जें बळजबरीनें करूं इच्छितात तें आम्ही समजुतीनें, तसेंच स्वतःच्या व स्वकीयांच्या उदाहरणानें करूं इच्छितों व करूं असा आम्हांला दृढ विश्वास आहे. मनुष्याच्या मूलभूत सज्जनतेवर आमचा विश्वास आहे व त्यांचा तरी अविश्वासच आहे असेंहि नाहीं. तथापि जमीनमालक आपण होऊन शेजाऱ्यांना जमिनी देतील या बाबतींत ते निराश झालेले आहेत, तसे आम्ही झालेलों नाहीं. आमच्यांतील कोणी उद्यांपर्यंत निराश होणारच नाहीं असा आम्ही निर्वाळा देऊं शकत नाहीं. पण जमीन-मालक तत्परता दाखवितील तर आम्हीं कम्युनिस्टांना जाऊन मिळण्याऐवजी

तेच आम्हांला येऊन मिळतील. कम्युनिस्टांचे गांधीवादी करणें किंवा गांधीवाद्यांचे कम्युनिस्ट करणें हें मालकांच्याच हातीं आहे !

### मग शांतिपाठ कां ?

" गांजलेल्या भूमिहीनांची गांजणूक तुम्ही तुमच्या शांतिपाठानें टिकवून धरण्यासच मदत करतां; जमिनदारी पद्धति जुलमाची आहे हें मान्य करूनहि तुम्ही शांततापालनासाठीं अडून कां राहावें ? जमिनदारांनीं कुळांचें पिढ्यान् पिढ्या चालविलेलें हिंस्र शोषण तुम्हांला खपतें पण कुळांनीं केलेला यत्किंचितहि प्रतिकार मात्र खपत नाहीं हा कोठला न्याय ?" असाहि अनेकांचा आक्षेप आहे.

पण बंडाळीला आमचा विरोध आहे त्यांत तात्त्विक किंवा नैतिक दृष्टिहि आहे आणि व्यावहारिक हिशेबहि आहे.

जमीनदारी व खंडवसुली ही अन्याय्य गोष्ट आहे हें खरें असलें तरी जमीनदार मानीत नाहींत म्हणून त्यांस मारझोड करून जमिनी सोडण्यास लावणें नैतिक दृष्ट्या उचित होणार नाहीं. कालपर्यंत कुळें आपण होऊन किंवा मुकाट्यानें त्यांना खंड घालीत होतीं. त्यामुळें मालक खंडजीवी बनले. मनुष्यमात्राला परमार्थाची ओढ आहे तशी स्वार्थाचीहि असतेच. स्वार्थ इतरांनीं चालूं दिला म्हणजे त्या स्वार्थाची त्याला संवय पडून जाते. ती संवय एका रात्रींत बदलणें त्याला जड जातें. आतां कुळांच्या स्वार्थी आकांक्षा चटकन् जागृत होतात तितक्याच जलदीनें मालकांची पारमार्थिक जागृति घडत नाहीं म्हणून त्यांना झोडपून काढणें उचित होईल का ? सबुरी करावयास नको का ? बरें, जीं कुळें त्यांना झोडपून काढणार तीं स्वतः आपापसांतील अन्याय अगोदर पुसटून टाकण्यास तयार आहेत का ? खालच्या पोट-कुळाकडून दिढी-दुपटीनेंहि खंड घेणाऱ्या कुळांनीं वरच्या मालकावर मात्र दांतओठ खाणें शोभेल का ? पण अशी स्थिति मात्र सर्वत्र आढळते.

सारांश, जुलूम आणि पिळणूक यांचा मक्ता मालकांनींच घेतलेला आहे असें नाहीं. बहुधा आपण सारेच साधेल तेथें पिळणूक करीतहि असतों आणि

उलटपक्षीं इतर आम्हांला पिळीतहि असतात. पिळणारा आणि पिळलेला दोघेहि एकाच देहांत एकत्र वस्ती करून राहतात. वाघ आणि शेळी एकाच पिंजऱ्यांत नांदतात ! पिंजरा जाळल्यानें तेवढी वाघशेळी (वाघ तीच शेळी) नाहींशी होईल पण वाघाचा हिंस्र वंश व शेळीचा शेळपट वंश दोन्ही हयातच राहणार. आपण सारेच वाघ–शेळी दोन्ही आहों. आपण सर्वांनींच परस्पर साह्यानें स्वत:तील हिंस्रपणा तसाच शेळपटपणा, अरेरावी मिनतवारी हीं दोन्हीं नष्ट करावयाचीं आहेत. तें आत्मशुद्धीनें आणि समजावणीनेंच घडू शकेल; मारझोडीनें एकटी दुकटी वाघशेळी मरेल, पण वंश अबाधितच राहील.

**आमच्या त्यांच्यांतील फरक**–समतेच्या बाबतींत आम्ही व कम्युनिस्ट एकत्र आहों हें खरें; पण कदाचित् चवाठ्यावरची भेटहि असेल. त्यांचीं आमचीं निघण्याचीं व पोंचण्याचीं, आदि व अंत, दोन्ही ठिकाणें भिन्न भिन्न आहेत, अर्थात् मार्गहि आमूलाग्र भिन्न आहेत.

प्रेम आणि वात्सल्य यांतूनहि मनुष्य साम्यवादाकडे येतो किंवा त्वेष आणि मत्सर यांतूनहि येतो. प्रेमांतून साम्यवादाकडे येणारा रस्ता मानवता-प्रकर्षाच्या टेकडीवर जातो तर, मत्सरांतून साम्यवादाकडे जाणारा रस्ता मानवता–विध्वंसाच्या खाईत जाऊन संपतो.

आम्हांला समता पाहिजे आहे. परंतु तें आमचें अंतिम उद्दिष्ट नव्हे. समता हें मानवतेच्या उत्कर्षाचें साधन म्हणून आम्हांला इष्ट आहे. अरेरावी व मिनतवारी हीं दोन्हीं मानवतेला सारखींच बाधक आहेत. म्हणूनच आम्हांला मिनतवारीचा वीट वाटतो, तितकाच अरेरावीचाहि वाटतो. जमिनीची वांटणी हें समतेचें ठळक लक्षण आहे. ही वांटणी मानवतेला म्हणजेच सज्जनतेला पोषक अशाच उपायानें साधावीं, असा आमचा प्रयत्न आहे.

उलटपक्षीं बंडाळी व दंगेधोपे यांनीं मानवताच नष्ट होते. सुक्याबरोबर किंबहुना सुक्याऐवजीं, ओलें जळतें; वडचाचें तेल वांग्यावर सांडतें. निष्पाप बालकांची हत्या घडते. स्त्रियांची विटंबना होते. निरुपद्रवी वृद्ध प्राणाला

मुकतात. अशानें जालिमाचें ( जुलूम करणाराचें ) पारिपत्य साधत असेल पण पीडिताचें दुःख निवारण दूरच राहतें. पीडा दसपट वाढते मात्र.

व्यावहारिक दृष्टचा पाहिलें तरी जे शोषक वर्ग असतात तेच सत्ताधीश व शस्त्रास्त्रांनीं सज्ज असतात. शोषितांना मनानें नसलें तरी परिस्थितिवशात् निरुपायानें निःशस्त्रच राहावें लागतें. शस्त्रांच्या सामन्यांत त्यांची हार होणार हें ठरलेलेंच आहे. निर्बल धनहीनानें बलिष्ठ धनिकांचा सामना शस्त्रबलानें करूं पाहणें हें गरुडानें पाण्यांत उतरून मगरीशीं झुंज देण्याप्रमाणेंच आहे. सत्य–अहिंसेच्या दोन्ही पंखांच्या आधारें उच्च पातळीवरून नैतिक झुंज देण्यांतच त्याची सलामती आहे.

## जमिनी फुकट कां वाटतां ?

प्रश्न :— भूमिहीनांना फुकटच्या जमिनी देऊन आपण त्यांना ऐदी नाहीं का बनवीत ? त्यांत त्यांचेंहि अहितच घडणार नाहीं का ? तसेंच त्यांत त्यांच्या स्वाभिमानाला बाध नाहीं का येत ?

उत्तर :– मुळांत जमिनी सर्वांनाच मोफत मिळालेल्या होत्या. हवा, पाणी, प्रकाश हीं अजूनहि सर्वांना मोफतच मिळत असतात आणि यांच्या साह्याखेरीज शेत पिकतहि नसतें.

उपप्रश्न :– तरीपण ओसाड व खडबडीत नव्हे तर कमावून सुधारलेली जमीन फुकट कां द्यायची ?

उत्तरः– पण ती कमावली कोणी ? मालकानें, कुळानें कीं मजुरांनीं ? ती कमाविण्याचें श्रेय सर्वांशीं नसलें तरी बहुतांशीं कुळाचें किंवा मजुरांचेंच आहे.

**उपप्रश्नः**– परंतु फलाण्या मजुरांच्या कष्टानें कमाविलेली जमीन निराळ्याच एकाद्या मजुराला फुकटांत का मिळावी ?

**उत्तर** :– ज्या भूमिहीनांना भूदानयज्ञांत जमिनी मिळणार ते बहुधा गेल्या कित्येक पिढ्यांपासून किंवा निदान वर्षांपासून कूळ किंवा मजूर

म्हणून कष्ट करीत आलेले असेच असणार. अर्थात् त्यांनीं उमेदवारी केले-लीच आहे. ते जमिनीचे हक्कदारच आहेत. आजवर त्यांना त्यांच्या हक्का-पासून वंचित टेवण्यांत आलेलें होतें. इंग्रजांनीं आमचें हिरावून घेतलेलें स्वराज्य आम्हांला मोफतच परत दिलें तशीच भूमिहीनांना जमीन द्यावयाची आहे. हें जमीन वांटप म्हणजे निर्वासितांची पुनर्वसाहत आहे.

**शेती ही एक कामगिरी** :— परंतु याहून महत्त्वाचा मुद्दा हा कीं या जमीन वांटपाचें स्वरूपच निराळे आहे. जमीन म्हणजे जणूं तिजोरी आहे आणि ती एकाची काढून फुकटची दुसऱ्याला मिळणार आहे ही समजूतच साफ बदलली पाहिजे. जमीन ही मिरास नव्हे, ती एक कामगिरी आहे. भूमिहीनाला आपण मालकी देत नाहीं; तो ती विकून टाकून फुकटचे पैसे कमावूं शकणार नाहीं. कारकुनाची कचेरीवर, किंवा शिक्षकाची शाळेवर, तशीच त्या लायक भूमिहीनाची भूमीवर नेमणूक करावयाची आहे. आणि शिक्षकाला फळा, नकाशे इत्यादि उपकरणें देतों तशीं शेतकऱ्यालाहि आऊत, खत, बियाणें इत्यादि द्यावयाचीं आहेत. आणि तो नीट काम करीत नाहीं असें आढळल्यास जमीन काढूनहि घ्यायची आहे. यांत भूमिहीनाच्या स्वाभि-मानाला बाध येण्यासारखें कांहींच नाहीं. जमीन स्वीकारून शेती करणें हें त्याचें देशाबद्दलचें कर्तव्यच आहे.

**शेतसारा वाढेलहि** :— वरील प्रश्नामागें आणखी एक भावना गर्भित आहे. ती अशी कीं जमिनीचें पीक हें शेतीच्या श्रमांच्या मोबदल्याहून अधिक असते ; त्यामध्यें सृष्टीची देणगीहि सामील असते. उदा० आपूस आंब्याचें कलम एकाच मोसमांत शेकडों रुपयेंसुद्धां देऊन जातें पण धन्याची मेहनत फळाच्या दशांशानें सुद्धां नसते. प्रत्येक शेत म्हणजे असलें धरतें झाडच आहे, दुभती गायच आहे.

भूमीच्या या मोफत देणगीवर हक्क कोणाचा ? त्या शेतकऱ्याचा एक-ट्याचाच नाहीं, तर साऱ्या समाजाचा; म्हणजेच सरकारचा. जमिनीवर सरकार सारा घेतें तें यासाठींच. भूमीचा दस्त हा भूमीच्या आयत्या देणगी-

इतका असावा. भूदान यज्ञानें जमिनीची जी नवी व्यवस्था घडवून आणायची आहे. तिच्यामध्यें या सरकार–दस्ताची फेरआकारणी करावयास पाहिजे.

सध्यां लागवडीच्या खर्चामध्यें खत, बियाणें, मशागत, राखण इत्यादीं बरोबर शेताच्या किंमतीवरील व्याजहि आकारण्यांत येत असतें. परंतु आमच्या योजनेमध्यें जमिनीला मोल नाहीं आणि भांडवलाला व्याज पण नाहीं अर्थात् आमच्या नवीन व्यवस्थेमध्यें जमिनीचें निवळ, म्हणजे आयतें, उत्पन्न हल्लींपेक्षां अधिक भरेल. म्हणजेच शेतसारा हा सुपीक जमिनीवर, किंवा बाजारी पिकांवर वाढेल आणि निकृष्ट जमिनीवरील अज्जी माफहि होईल; किंबहुना ओसाड जमिनीच्या सुधारणेसाठीं सरकार शेतकऱ्याला मदतहि देईल. ही फेर आकारणी करतांना राज्यशासनाच्या मार्गांतील, म्हणजेच सार्वजनिक कारभारांतील, अनेक अडचणीहि लक्ष्यांत घ्याव्या लागतील; तथापि एकंदरींत त्या त्या जमिनीच्या व पिकाच्या स्वरुपानुसार शेतींतून कमीज्यास्त प्रमाणांत मिळणारें आयतें उत्पन्न एकेकट्या कसवटदाराला लाभण्याऐवजीं साऱ्या समाजाला लाभेल अशी व्यवस्था योजणेंच उचित होईल.

**रास्त खंड घेऊं हि**—सुधारलेल्या जमिनीवर कांहीं मुदतीपर्यंत उतरत्या प्रमाणांत खंड वसूल करणें वाजवी आहे हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. अर्थात् अशा कांहीं जमिनी भूदान यज्ञांत वाटण्यांत आल्या तर त्यांचा कांहीं वर्षेंपर्यंत खंड वसूल करून तो कोणत्या तरी प्रकारें सार्वजनिक कार्याला लावण्यांत यावा हें उचित आहे. असे प्रसंग अपवादात्मकच रहातील.

## ६ हा पक्षपात नव्हे का ?

**प्रश्न**—तुम्हांला कुळांमजुरांचा तेवढा कळवळा येतो पण सध्यां मध्यम वर्गीय जमीन-मालकांचे हाल कुत्रासुद्धां खात नाहीं ! नव्या नव्या कायद्यांपायीं खंडाचें उत्पन्न शून्यावर आलेंय आणि दुसऱ्या बाजूनें आमचे मुलगे परीक्षा पास झाले तरी त्यांना नोकऱ्या मिळत नाहींत. त्यांना शेतींतच

घालूं म्हटलें तरी सत्तेची जमीन सुद्धां कुळांकडून काढतां येत नाहीं. कायद्याच्या अडथळ्यांतून मार्ग निघाला तरी तुमचा राजरोस प्रचार चालू असतो कीं कुळांनीं प्राण गेला तरी आपापल्या वहिवाटी सोडूं नये. जमीन विकायला काढावी तर गिऱ्हाईक नाहीं. आमचा असा चारी बाजूंनीं कोंडमारा करणें अन्यायाचें नाहीं का?

**उत्तर**--कूळ-मजूर तेवढेंच आमचे असें नव्हे. पांढरपेशे आम्हांला अधिकच जवळचे आहेत; आम्ही त्यांच्यांतीलच आहों. त्यांच्या अडचणी त्या आमच्याच अडचणी आहेत. त्यांतून आपण न्यायसंगत असा मार्ग परस्परांच्या साह्यानें काढला पाहिजे. ज्याला त्याला झेंपेल-जुळेल व समाजालाहि पोषकच होईल असें कांहीं काम प्रत्येकाला मिळालें पाहिजे आणि त्या कामांतून त्याच्या अन्नवस्त्रादि वाजवी गरजा भागल्या पाहिजेत. मात्र यासाठींच ज्याच्या हातीं जें काम आहे तें त्याचे हातून हिरावून घेऊन दुसऱ्या नवख्याच्या हातीं देण्यांत अर्थ नाहीं; आज जे शेतींत गुंतलेले आहेत त्यांना जमिनीवरून हुसकून लावणें वाजवी नाहीं. तुमच्या मुलांसाठीं त्यांना जुळेलसें शिक्षकाचें, कारकुनीचें किंवा कसल्या तरी कौशल्यपूर्ण व हलक्या शरीरश्रमाचें काम शोधून काढावयास पाहिजे. ते शेती करणार म्हणतां ती मजुरांकरवीं, त्यांचेवर फक्त देखरेख करूनच, करण्याचा इरादा असेल तर तें यापुढील काळांत जुळणार नाहीं, परवडणार नाहीं व शोभणार हि नाहीं. त्यांना मनःपूर्वक मजूरपेशा पत्करायचा असेल तर ती स्तुत्य गोष्ट आहे. त्यांनीं उमेदवारी, म्हणजे मजूरपेशा, सराव करीत करीत पत्करावा म्हणजे त्यांना हि इतर भूमिहीनांबरोबर किंबहुना त्यांचे अगोदर, ( कारण बुद्धिमान् शेतकरी हे अधिक कर्तबगार व इतरांना मार्गदर्शकहि होतील ) जमिनी व साधनें विकावयास पाहिजेत. मात्र त्यासाठीं सध्यांच्या शेतकऱ्यांना निर्वासित करणें कायदेशीर असलें तरी न्यायाचें ठरणार नाहीं. त्यांनीं बिचाऱ्यांनीं काय करायचें ? तुमच्या मुलांपाशीं शिक्षण आहे तेंहि त्यांचेपाशीं नाहीं. कचेऱ्यांप्रमाणें कारखाने हि भरून गेलेले असल्यानें त्यांची कारखान्यांत मजूर म्हणून हि सोय लावणें दुरापास्त आहे. व म्हणूनच आमचा कुळांना " बे-दखल " –भूमिभ्रष्ट–करण्याला विरोध आहे.

कुळांकडे जरूरीपेक्षां फाजील जमिनी असतील तर त्यांनींहि त्या इतरां-साठीं प्रेमपूर्वक सोडाव्या अशी आमची त्यांनाहि प्रार्थना आहे. तसेंच ते जमिनीची नीट मशागत करीत नसतील तर त्यांचेकडून त्या काढून घेण्याची कायद्यानेंहि तजवीज व्हावयास पाहिजे.

असो. आजवर श्रमजीवी वर्गाचें शोषण झालें व अवहेलनाहि झाली. आतां या अन्यायाच्या निराकरणासाठीं ऐतखाऊ वर्गांनीं आपली राहणी बदलण्याचा कसून प्रयत्न करावयास पाहिजे. तसेंच त्यांनीं आपल्या कायदेशीर हक्कांचा ताठा सोडून देऊन कुळां–मजुरांशीं आदराची नम्रतेची व आर्ज-वाची वृत्ति धारण करावी. मग भलीं कुळेंहि आपल्या धन्यांची कदापि आबाळ होऊं देणार नाहींत.

आज मालक वर्ग हा एकप्रकारें कुळांच्या पाठीवर बसून भव–सागर तरून जात आहे! आम्ही त्यांना म्हणतों तुम्हीहि पाण्यांत उतरून हातपाय मारा म्हणजे तुम्हीहि पोहायला शिकाल आणि त्यांत तुम्हांला मौजहि वाटं लागेल. यांत आमचा हेतु तुम्हांला बुडविण्याचा नसून उभयवर्गांना सुखानें पोहते करण्याचाच आहे.

आपल्या रत्नागिरी जिल्ह्यांत बडे जमीनदार नाहींत हें खरें असलें तरी छोटया जमिन–मालकांना सुद्धां खंड देतां येईल इतक्या दर्जाची जमीन इकडे फार कमी. स्वतःची जमीन कसणाऱ्या शेतक-याचा प्रपंच भागण्याची जेथें पंचाईत तेथें दुसऱ्याला खंड घालणाऱ्या कुळाचा प्रपंच कसा भागणार? इकडे खंड षष्ठांशावर उतरूनहि भागण्यासारखें नाहीं. खंडाचा नष्टांशच व्हायला पाहिजे!

यांत एकाला मारून दुसऱ्याची भर करण्याचा हेतु नाहीं. आजवर श्रम-जीवी वर्ग पिळला गेला व पांढरपेशा वर्ग पंगु बनला. यापुढें उभयतांनीं आपापल्याला जुळणारा उद्योग करावा व उभयतांनीं सुखानें जगावें. एकानें पंगूपणा झाडून टाकावा, दुसऱ्यानें अडाणीपणा व बेजबाबदारपणा मागें टाकावा. ही जीवनाची वाढ आहे, मरण नव्हे. यांत हानि कोणाचीच नाहीं.

सर्वांचा लाभच आहे.

सुशिक्षितांची बेकारी दूर करण्याचा एक इलाज त्यांनीं कष्टाळू जीवन पत्करणें हा आहे तसाच दुसरा एक इलाज केंद्रित उद्योगांवर, म्हणजे कारखान्यांवर, नियंत्रण घालून विकेंद्रित उद्योगांना, म्हणजे सुटया ग्रामोद्योगांना, सुरक्षित व संघटित करणें हा हि आहे. म्हणूनच भूदान–यज्ञाबरोबरच आम्ही खादी व गांवठी तांदूळ, पीठ, तेल व गूळ, साखर यांचा तसेंच गांवठी, अहिंसक, चर्मोद्योगाचा हि प्रचार करतों व त्यांच्या संरक्षणार्थ यांत्रिक उद्योगांचा बहिष्कारहि पुकारतों.

## देण्यांतील परमानंद

मी कबूल करतों कीं, आतांपर्यंतची माझी मांडणी कांहींशा तिखट शद्बांत, धाकदटावणीच्या स्वरूपांत झाली; निषेधात्मक झाली, त्यांतील हेतु माझे मुद्दे नीट लक्षांत यावे एवढाच होता. कोणा एकटया दुकटया व्यक्तीला, किंवा वर्गाला अनुलक्षून माझें बोलणें नव्हतें, तर आम्हां सर्वांच्याच जीवनामध्यें जें महाभारत अखंड घडलें जात आहे त्यांतील दुर्योधन-दु:शासनादिकांची पुरी पारख करुन द्यावी, कारण त्याखेरीज त्यांचा पाडाव कसा करायचा तें कळणार नाहीं एवढाच हेतु होता. तरी तोल सुटून कांहीं अधिक उणें लिहिलें गेलें असल्यास सहृदय वाचकांनीं त्यांतील भावार्थ तेवढा लक्षांत घ्यावा व राग मानूं नये.

कारण मला खात्रीच आहे कीं, माणसाच्या हृदयामध्यें सत्प्रवृत्तींच्या दसपट दुष्प्रवृत्ति जोर करीत असल्या, पांच पांडवांविरुद्ध शंभर कौरव खडे असले, तरी त्यांतील सर्वश्रेष्ठ विभूति धर्मराजच आहे. आणि किती घोर रणकंदन झालें आणि धर्मराजाला कांहीं काळ वनवास, अज्ञातवास काढावा लागला तरी त्याचाच अंतिम विजय होणार आहे.

मनुष्य स्वार्थी आहे हें सर्वमान्यच आहे, पण त्याहूनहि तो परमार्थी आहे. कारण तो मलिन देह आहे त्याहूनहि निर्मळ, मंगलमय आत्मा आहे.

व्यवहारांतील वापरानें त्याचा तांब्या डागळलेला, विटलेला दिसत असला तरी तो मुळांत चकाकित धातूचाच घडलेला आहे, स्वच्छ राखेनें जरा घासण्याचीच खोटी कीं तो परत चकाकित होणार. विनोबाजी स्वतःच्या वैराग्यवन्हीच्या स्वच्छ राखेनें आणि भक्तिजलानें माणसांच्या मनांचे कलश झरझर चकाकित करीत असल्याचें प्रत्यक्ष आपण पाहतोंच आहों ना ?

माणसाला घेण्यांत, दुसऱ्याला लुबाडण्यांत, आनंद वाटतो हें खोटें नाहीं. आगगाडींत दुसऱ्या कोणाची भोकाची दिडकीच जरी मला सांडलेली मिळाली तरी तेवढयानें मला आनंद होतो. ज्याची ती हरवली त्याच्या-बद्दलचा कळवळा त्या आनंदाच्या लहरींत पार बुडून जातो, हें खोटें नाहीं. तरी पण दुसऱ्याच्या मदतीला धांवून जाण्यांत, दुसऱ्यासाठीं जीव देण्यांतहि माणसाला परमानंद वाटत असतो. कारण ज्याला आपण 'दुसरा' म्हणतों तो दुजा नसून आपणच आहों याची अंधुक आणि अस्पष्ट का होईना, पण प्रत्येकाला सहज जाणीव असतेच. त्यासाठीं खास योगसाधन करण्याची जरूरी नाहीं. ( भूतांत भरला आत्मा, भूतें आत्म्यांत राहिलीं । योगानें जोडिला देखे । हेंचि सर्वत्र दर्शन—गीताई ६–२९ ).

अरेरावींत आनंद आहे त्याच्या शतपट नम्रपणांत आहे ('लहानपण देगा देवा'—तुकाराम), जिंकण्यांत आनंद आहे त्याहूनहि जिंकलें जाण्यांत, शरण जाण्यांत और आनंद आहे ! दासाला किंमत आहेच, पण एका दोस्ताच्या पासंगाला तरी हजार दास येऊं शकतील का ? जगण्यांत आनंद आहे पण मरण्यांत परमानंद आहे. केळ आम्हांला मधुर केळीं देते आणि स्वतः मरून जाते. माता मुलांना वाढविण्यासाठीं स्वतः झिजते.

ज्यांना आपण शूद्र म्हणून राबविलें, तिरस्कारिलें, दास केलें, ते आमचे सख्खे भाऊच आहेत. आतां, ही ओळख पटल्यानंतर, तो कुणबी, तो महार, दूर दूर राहिलेला मलाच खपत नाहीं.

माणूस सोबतीसाठीं आशावलेला असतो. सोबत समानशीलाचीच होऊं शकते. राजाच्या सभोंवार शंभर हुजरे असले तरी त्याला एकलकोंडेंच

वाटणार. पूर्वी आपले संस्थामिक आपली राजधानी सोडून दूर दूर फिरायला जात. राजधानींत त्यांना करमेना, कारण राजधानींत त्यांना कोणी समान दर्जाचा सोबती भेटेना, कीं जो त्यांची थट्टा मस्करी करील, त्यांच्याशीं वाद घालील, प्रसंगीं त्यांना एखादी थप्पडहि लगावील! सारेच लाळघोटचे, हांजीखोर. परदेशांत त्यांना कोणी राजे म्हणून ओळखीत नसल्यानें तिकडे त्यांना सोबत लाभे.

कोणी सोबतीला पाहिजे एवढचासाठीं तर राजे आपल्या प्रजाजनांपैकीं कांहींना पदव्या, जहागिऱ्या व वस्त्रें बहाल करून स्वतःच्या "बरोबरीचे" (पीअर्स) बनवीत !

या आंतरिक प्रेरणेच्या नांवानेंच आम्ही मालकांना विनवून सांगतों, त्यांच्या आमच्या व समाजाच्या कल्याणासाठीं व उन्नतीसाठीं सांगतों कीं भूमीवरील मालकी सोडून द्या, फक्त लायकी सांगा.

हा उपकार नव्हे, ही सक्तीहि नव्हे, हा उत्सव आहे, प्रेमालिंगन आहे. हा उत्सव ज्याला मानवत नाहीं त्या अभाग्याला आम्ही हेंहि सांगतों कीं प्रेमासाठीं नाहीं तर स्वार्थासाठींसुद्धां तुला हेंच करायला पाहिजे. प्रामाणिकपणा हा स्वयंप्रेरणेनें तर आचरावाच पण स्वार्थ व सुरक्षितता यांसाठींसुद्धां त्याची आवश्यकताच आहे.

कित्येकांना भूदान यज्ञ हा क्रांतिकारक कार्यक्रम म्हणून आकर्षक वाटतो पण मला तर त्यांत नवीन असें कांहींच दिसत नाहीं. आजवर सारे सज्जन, सत्पुरुष, तत्त्ववेत्ते जी रीतभात आचरीत व शिकवीत आले, सर्व सज्जनांच्या जी अंगीं मुरलेलीच आहे, त्या रीतींतील हें पुढचें अटळ पाऊल आहे.

## आपला नवभारत

आपल्याला जो नवभारत, नवमहाराष्ट्र, नवकोंकण, नव-रत्नागिरी

घडवायचा आहे त्याचें जें चित्र आपल्या मनापुढें आहे त्यांत एवढे कारखाने, एवढे लोहमार्ग, एवढीं धरणें, एवढीं कोठारें दाखवून आमचें समाधान होणार नाहीं. तर या चित्राच्या मध्यभागीं मनुष्य पाहिजे; त्याच्या अनेकों-नेक हस्तांत हीं सारीं आयुधें-आभूषणें म्हणूनच शोभतील.

क्रमांक

आपल्या रत्नागिरी जिल्ह्यांत अमुक लाख आंब्यांचीं कलमें लावणें, जिल्ह्यांतील एकन्‌एक आंबझाड आपूस बनविणें, हें आपलें अंतिम ध्येय नव्हे. ते आंबे चाखायला माणसें असतील तरच त्या आंब्यांचा उपयोग ! सध्यां आपल्या जिल्ह्यांत १७॥ लाख माणसें आहेत. पण तीं बहुतेक सारीं रायवळच आहेत, कारण आपूस माणसें सारीं परमुलुखीं रवाना होतात. बाहेरच्या मुलुखांना आपण आपूस आंबे, आपूस माणूस अवश्य पुरवावे पण जाग्यावरील माणसेंहि सारीं आपुसासारखीं मधुर, काजूसारखी स्निग्ध, कोंकमासारखीं सौम्य, चांफ्यासारखीं सुगंधी बनल्याखेरीज आपलें समाधान नाहीं. आम्हांला येथें कोणी अडाणी, नेभळा, दीनवाणा नको, कोणी मवाली, उन्मत्तहि नको; कोणी थंडीनें कांकडणारा नको, कोणावर भर उन्हाळचांत उष्म्यानें जीव कासावीस होत असतांहि शिष्टपणाखातर जाकिटावर कोट चढविण्याची सक्ती नको ! मला स्वतःला जसें व्हावें, जसें राहावें असें वाटतें, तसेंच जिल्ह्यांतील माझ्या यच्चयावत् बंधु-भगिनींनीं राहिलें पाहिजे असा माझा हट्ट आहे. तेली, माळी, कुणबी, महार, झाडून साऱ्यांनीं आपल्या फाटक्या कुजक्या गोधडचा जाळून-चुकलों, कंपोस्ट खड्डयांत घालून-सतरंजी-चादरी-घोंगडीचीं आंथरुणें केलीं पाहिजेत. मला अवचित कोणाकडे वस्तीला राहावें लागलें तर मला त्याच्या घरीं मनाजोगें आंथरुण-पांघरूण मिळालें पाहिजे. आणि झोंपण्यापूर्वीं चौरस जेवण तर पाहिजेच ! माझें एकहि घर कोंदट, गलिच्छ असतां कामा नये.

असा कोंकण, असा महाराष्ट्र, असा भारत आपल्याला बनवायचा आहे. त्यासाठीं आपल्यामध्यें कोणी शूद्र नको, कूळ नको, सांगकाम्या मजूर नको; कोणी आळशी, ऐदी, मिजासखोरहि नको.

## संपत्तिदान, श्रमदान, जीवनदान.

मला हें सारें नको, आणि तुम्हांला त्याची हौस आहे असें थोडेंच आहे ?

तर मग हा भूदान–यज्ञ आपल्या या शुभ कामना पुरविण्यासाठींच अवतरला आहे त्याचें स्वागत करा.

भूमिवानांनीं भूमि द्यावी तसेंच संपत्तिवानांनीं —आपण सारे संपत्तिवान आहोंच — आपल्या संपत्तीचा सहावा किंवा कमीजास्त पण निश्चित हिस्सा समाजाला परत करण्याचें कर्तव्य अंगिकारावें. याला "संपत्तिदान यज्ञ" म्हणायचें. "सब संपत्ति रघुपति की आही"— जगांतील साऱ्या संपत्तीचा एकमात्र मालक प्रभु आहे. मला जी संपत्ति मिळाली, किंवा मिळत आहे, ती माझ्या कर्तबगारीनें मिळालेली नाहीं. आजवर साऱ्या मानवजातीनें कमाविलेली संपत्ति व साधनें मला आयतीं वारसा हक्कानें प्राप्त झालीं ; तसेंच दुनियेच्या चालू व्यवहारांत एकाला भरपूर संपत्ति प्राप्त होते आणि दुसऱ्याचें दिवाळें वाजतें त्याच्या मुळाशीं योगायोग असतो हें सहजीं लक्षांत येण्याजोगें आहे. माझ्या कर्तबगारीनेंच संपत्ति मिळालीं असें मानलें तरीं ती कर्तबगारी सुद्धां मला प्रभुकृपेनेंच मिळाली. एकाद्याला निपजतच मधुर आवाज आणि गायनाची कला प्राप्त होते ; आणि आमच्या पूर्वजांनीं ग्रामोफोन आणि रेडियो यांचा भरपूर विकास केलेला असल्यानें त्या साधनांचे आश्रयानें एकाद्या गायिकेला एकाच गाण्याचें रेकार्ड घेऊन आणि त्याच्या लक्षावधि प्रती विकून लक्षावधि रुपये कमावतां येतात पण देवानें तिला गोड गळा दिला तो तिनें पंधरा मिनिटांच्या कामगिरीवर जन्मभर इतरांना राबवून चैन भोगावी अशासाठीं नव्हे. देव कांहींना विशेष बुद्धि–शक्ति देतो ती त्यांनीं इतरांवर प्रभुत्व गाजवावें यासाठीं नव्हे; तर त्यांची ती शक्ति इतरांच्याहि उपयोगी पडावी म्हणून. ईश्वराकडून व समाजाकडून अशा तऱ्हेनें मिळणाऱ्या संपत्तींपैकीं स्वतःच्या चालू वाजवी गरजेपुरती स्वतः भोगून बाकीची समाजाला परत करणें हेंच मनुष्याचें कर्तव्य आहे. जन्मसिद्ध भेद आणि सामाजिक व्यवहारांतील योगायोग यांमुळें उद्भवणारी आर्थिक

विषमता साऱ्या अतिरिक्त संपत्तीच्या दानानें जेथल्या तेथें व जेव्हांची तेव्हांच दुरुस्त होत रहावी हें समाज-स्वास्थ्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

मनुष्य हा समाजावलंबी प्राणी आहे. समाजाच्या आश्रयानें व समाजाशीं व्यवहार केल्यानेंच त्याला संपत्ति प्राप्त होत असते. म्हणून ज्याच्यापाशीं जें असेल–भूमि, धन, बुद्धि, किमान पक्षीं शरीरबल–तें समाजाच्या कारणीं लावून त्यानें मोकळें व्हावें. अशानेंच जीवन कृतार्थ होतें.

पण लोभ सुद्धां माणसाच्या पांचवीला पूजलेला असतो! भूमि, संपत्ति इत्यादि कोणाला कितीहि प्राप्त झालेली असली तरी ती त्याला पुरेशी वाटतच नाहीं, आणखीहि पाहिजे असते. तेव्हां "ज्यादा जमीन" किंवा "ज्यादा संपत्ति" म्हणजे तरी काय? तर जों पर्यंत दुसऱ्यापाशीं माझ्यापेक्षां कमी आहे तों पर्यंत माझ्याकडे ज्यादाच आहे. पाणी जसें चटकन् समपातळी साधतें, तद्वत्च भूमि व संपत्ति समपातळींत रहावी. रेशनिंगच्या काळांत ज्याप्रमाणें धान्य, गूळ-साखर, घासलेट इत्यादींचे सांठे ताब्यांत घेऊन सरकार त्यांची समवाटणी करीत असे, रेशनचें प्रमाण पुरेसें आहे कीं नाहीं तें पहात नसे, किंवा "पुरेशा प्रमाणांत देतां येईल तेवढ्यांनाच साखर देऊं, इतरांना मुळींच नको" असें म्हणत नसे, त्याप्रमाणेंच आज भूमीचें व संपत्तीचें रेशनिंग व्हायला पाहिजे. भावाभावांतील जमिनीचें वांटप असेंच होत असतें. मग आपल्याला जर खरोखरच बंधुभाव जोडायचा असेल तर तुटपुंजा जमिनीचेंहि वांटप व्हावयास नको का? कांहींनीं चौरस आहार घेऊन बाकीच्यांनीं त्यांच्या तोंडाकडे पाहत रहाण्यापेक्षां आपल्या सोबत्यांसमवेत अर्धपोटी जेऊन उठण्यांतहि आपण अधिक समाधान अनुभवीत नाहीं का?

हाच मानवधर्म आहे. आणि "धर्मात् अर्थश्च कामश्च"–धर्मपालन केल्यानें संपत्ति व सुख हीं सहजीं साधतात.

या मानवधर्माच्या पालनानें समाजांत संतोष, सलोखा, सहकार्य नांदेल व उत्साह संचरेल. त्यांतून अनायासें समृद्धिहि उद्‌भवेल.

शांतिः पुष्टिः तुष्टिः चास्तु !

अनुक्रम ९८८७१७
विभाग ३. नि.
क्रमांक ८८०८
नों. दि. १०।२५५५

आवृत्ती १ ली २०००
आवृत्ती २ री १००००
(जानेवारी १९५५)

८९८७
REFBK-0008187

महाराष्ट्र भूदान प्रकाशनें:—

| | | | |
|---|---|---|---|
| * आंदोलन | किंमत | ३ | आणे |
| * भूमिका | ,, | १ | आणा |
| * शंका-समाधान | ,, | ३ | आणे |
| * भूदान-पद्यमाला | ,, | २ | आणे |
| * जीवनदान | ,, | २ | आणे |

आणि भूदानासंबंधींचें हिंदी वाङ्मय

★

प्रकाशक : सदाशिव जगन्नाथ ऊर्फ भाऊ धर्माधिकारी,
सहमंत्री, महाराष्ट्र सेवा संघ, ३६१ सदाशिव पेठ, पुणें २.
मुद्रक : मो. दि. जोशी, बी. ए. एल्एल्. बी., एम्. पी.
बलवंत मुद्रणालय, रत्नागिरी.